४.१३ शासन निर्णय, नगर विकास विभाग, क्रमांक एमआरडी-२०२१/सं.क्र.५१६/नवि-७, दिनांक ११ ऑक्टोबर, २०२१ नुसार मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील गट-अ ते गट-ड या संवर्गातील दिव्यांगासाठी सुनिश्चित करण्यात आलेली पदे व विकलांगतेचा प्रकार खालीलप्रमाणे :-

| Category Abbreviations Used | | | Functional Requirement Abbreviations Used | | |
|---|---|---|---|---|---|
| No. | Abbreviations | Long Form | No. | Abbreviations | Long Form |
| 1. | B | Blind | 1. | S | Sitting |
| 2. | LV | Low Vision | 2. | ST | Standing |
| 3. | D | Deaf | 3. | W | Walking |
| 4. | HH | Hard of Hearing | 4. | BN | Bending |
| 5. | OA | One Arm | 5. | L | Lifting |
| 6. | OL | One Leg | 6. | KC | Kneeling & Crouching |
| 7. | BA | Both Arms | 7. | JU | Jumping |
| 8. | BL | Both Leg | 8. | CRL | Crawling |
| 9. | OAL | One Arm and One Leg | 9. | CL | Climbing |
| 10. | BLOA | Both Leg One Arm | 10. | P | Pulling & Pushing |
| 11. | BLA | Both Legs Arms | 11. | MF | Manipulation with Fingers |
| 12. | CP | Cerebral Palsy | 12. | RW | Reading & Writing |
| 13. | LC | Leprosy Cured | 13. | SE | Seeing |
| 14. | Dw | Dwarfism | 14. | H | Hearing |
| 15. | AAV | Acid Attack Victims | 15. | C | Communication |
| 16. | MDy | Muscular Dystrophy | | | |
| 17. | ASD | Autism Spectrum Disorder (M=Mild, MoD=Moderate) | | | |
| 18. | ID | Intellectual Disability | | | |
| 19. | SLD | Specific Learning Disability | | | |
| 20. | MI | Mental Illness | | | |
| 21. | MD | Multiple Disabilities | | | |

**५. अनाथ आरक्षण :-**

५.१ अनाथ व्यक्तीचे आरक्षण हे शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग, क्रमांक अनाथ-२०२२/प्र.क्र.१२२/का-०३, दिनांक ६ एप्रिल, २०२३ व समक्रमांकाचे शासन पुरकपत्र दिनांक १० मे, २०२३ व समक्रमांकाचे शासन पुरकपत्र दिनांक १४ नोव्हेंबर, २०२५ तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात येणाऱ्या आदेशानुसार राहील.

५.२ शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग, क्रमांक अनाथ-२०१८/प्र.क्र.१८२/का-०३, दिनांक ६ सप्टेंबर, २०२२ तसेच दिनांक ६ एप्रिल, २०२३ अन्वये अनाथ प्रवर्गासाठी दावा दाखल करणाऱ्या उमेदवाराने अर्ज सादर करतेवेळी महिला व बालविकास विभागाकडील सक्षम प्राधिकारी यांचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. अन्य यंत्रणांमार्फत वितरीत करण्यात आलेली प्रमाणपत्रे गाह्य धरण्यात येणार नाहीत.

५.३ अनाथ आरक्षणाचा लाभ घेऊन शासन सेवेत रुजू होणाऱ्या उमेदवारांना अनाथ प्रमाणपत्र पडताळणीच्या अधीन राहून तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देण्यात येईल. अनाथ प्रमाणपत्र व महाराष्ट्र राज्याचे मूळ अधिवास प्रमाणपत्र कागदपत्रे पडताळणीचेवेळी सादर करणे आवश्यक राहील. नियुक्ती पश्चात ६ महिन्यांच्या कालावधीत आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे यांचेकडून अनाथ प्रमाणपत्राची पडताळणी करून घेण्यात येईल.

Rojgar Marathi.com

५.४ अनाथांसाठी "संस्थात्मक" व "संस्थाबाह्य" अशा दोन प्रकारामध्ये आरक्षण देय राहील.

I. "संस्थात्मक" : संस्थात्मक या प्रवर्गामध्ये ज्यांच्या वयाची १८ वर्षे पूर्ण होण्यापूर्वी त्यांच्या आई-वडीलांचे निधन झाले आहे व ज्यांचे केवळ महिला व बाल विकास विभागांतर्गत बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियमान्वये कार्यरत बालकांच्या काळजी व संरक्षणाशी संबंधित संस्थेमध्ये पालन-पोषण झाले आहे (त्यांच्या नातेवाईकांची अथवा जातीची माहिती उपलब्ध असो किंवा नसो) अशा बालकांचा समावेश असेल."

II. संस्थाबाह्य आरक्षण : संस्थाबाह्य आरक्षणामधून लाभ घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांमध्ये ज्यांच्या वयाची १८ वर्षे पूर्ण होण्यापूर्वी त्यांच्या आई वडीलांचे निधन झाले आहे आणि ज्यांचे शासन मान्यताप्राप्त संस्थेबाहेर / नातेवाईकांकडे संगोपन झालेले आहे अशा उमेदवारांचा समावेश असेल.

५.५ शासन पुरकपत्र, महिला व बाल विकास विभाग, क्रमांक अनाथ-२०२२/प्र.क्र.१२२/का-०३, दिनांक १० मे, २०२३ अन्वये अनाथांच्या एका प्रवर्गासाठी उपलब्ध जागांवर गुणवत्तेनुसार त्या प्रवर्गातील अनाथ उमेदवार पर्याप्त प्रमाणात उपलब्ध होऊ शकले नाहीत तर ती पदे अनाथांच्या दुसऱ्या प्रवर्गातील उमेदवारांमधून गुणवत्तेनुसार भरण्यात येतील. सबब, सदर जाहिरातीमध्ये अनाथांच्या एका प्रवर्गासाठी पद राखीव असले तरी, दोन्ही प्रवर्गातील (संस्थात्मक / संस्थाबाह्य) उमेदवारांनी अर्ज सादर करणे आवश्यक राहील.

५.६ अनाथांसाठी आरक्षित पदावर गुणवत्तेनुसार निवड झालेल्या उमेदवारांचा समावेश सदर उमेदवार ज्या सामाजिक प्रवर्गाचा आहे त्या प्रवर्गातून करण्यात येईल.

**६. <u>माजी सैनिक आरक्षण</u> :-**

६.१ शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक आरटीए-१०७९/४८२/१६-अ, दिनांक १६ एप्रिल, १९८१ अन्वये, माजी सैनिक उमेदवारांना समांतर आरक्षण लागू करण्यात आले आहे.

६.२ जिल्हा सैनिक बोर्डात नाव नोंदणी केले असल्याबाबत प्रमाणपत्र व सेवा तपशील दर्शविणारे अभिलेखा प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

६.३ शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक आरटीए-९०९०/६२/प्र.क्र.२२२/९१/२८ मुंबई, दिनांक ३० डिसेंबर, १९९१ अन्वये माजी सैनिकांना शासन सेवेत नागरी सेवेतील पदावर नियुक्तीसाठी देण्यात येणाऱ्या सवलतीचा त्यांनी एकदा फायदा घेतल्यावर नागरी सेवेतील पदावर नेमणुकीसाठी दुसऱ्यांदा तसा फायदा घेता येणार नाही.

६.४ उमेदवार स्वत: माजी सैनिक असल्यास त्याने याबाबत स्पष्टपणे दावा करणे आवश्यक आहे, अन्यथा त्यास माजी सैनिकांना अनुज्ञेय असलेले लाभ मिळणार नाही.

६.५ माजी सैनिक आरक्षणाचा लाभ घेण्याकरीता संबंधित उमेदवाराने सदर आरक्षणासंदर्भात शासनाने वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या अटी व शर्तीची पूर्तता करणे अनिवार्य आहे.

६.६ गुणवत्ता यादीमध्ये येणाऱ्या माजी सैनिक उमेदवारांनी जिल्हा सैनिक बोर्डात नाव नोंदणी केली असल्यास मूळ प्रमाणपत्र व इतर आवश्यक कागदपत्रे तपासणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील. निवड झालेल्या माजी सैनिक उमेदवारांच्या कागदपत्रांची सक्षम अधिकाऱ्याकडून पडताळणी करण्यात येईल व पडताळणीच्या अहवालाच्या आधारे संबंधित उमेदवाराच्या निवडीबाबत अंतिम निर्णय घेण्यात येईल.

६.७ शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक आरटीए-१०८२/३५०२/सीआर-१००/१६-अ, दिनांक २ सप्टेंबर, १९८३ नुसार,

I. माजी सैनिकांसाठी आरक्षित असलेल्या पदांवर भरती करताना युध्द काळात आणि युध्द नसताना सैन्यातील सेवेमुळे दिव्यांगत्व आले असल्यास, असा माजी सैनिक १५ % राखीव पदांपैकी उपलब्ध पदांवर प्राधान्य क्रमाने नियुक्ती देण्यास पात्र राहील.

II. युध्द काळात किंवा युध्द नसताना सैनिक सेवेत मृत झालेल्या किंवा अपंगत्व येऊन त्यामुळे नोकरीसाठी अयोग्य झालेल्या माजी सैनिकांच्या कुटूंबातील फक्त एका व्यक्तीला त्या नंतरच्या पसंतीक्रमाने १५ % आरक्षित पदांपैकी उपलब्ध पदावर नियुक्तीस पात्र राहील. तथापि, उमेदवाराने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातील सेवाप्रवेश नियमानुसार उपलब्ध पदासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हता धारण केलेली असणे आवश्यक आहे.

Rojgar Marathi.com

६.८ शैक्षणिक अर्हता :-

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक आरटीए-१०८२/२३२७/सीआर-६३/१६-अ, दिनांक ५ ऑक्टोबर, १९८९ नुसार, विहित केल्याप्रमाणे पदवी परीक्षा ही पात्रता आवश्यक असलेल्या आणि तांत्रिक अथवा व्यावसायिक कामाचा अनुभव आवश्यक ठरविलेला नसलेल्या पदांच्या बाबतीत १५ वर्षे सेवा झालेल्या माजी सैनिकांनी एस.एस.सी. उत्तीर्ण असल्याचे किंवा इंडियन आर्मी स्पेशल सर्टिफिकेट ऑफ एज्युकेशन अथवा तत्सम प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

६.९ आवश्यक प्रमाणपत्र :-

I. सैनिकी सेवेतून मुक्त केल्याबाबतचे प्रमाणपत्र :-
माजी सैनिकांसाठी असलेल्या वयोमर्यादा व आरक्षणाचा फायदा घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांनी विहित नमुन्यात सक्षम प्राधिकाऱ्याने प्रदान केलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

II. जात प्रमाणपत्र व नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र :-
उमेदवार ज्या सामाजिक प्रवर्गामध्ये समाविष्ठ होत असेल, त्या प्रवर्गासंबंधीचे जात प्रमाणपत्र तसेच वैध नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र (लागू असल्यास) सादर करणे आवश्यक आहे.

III. जाहिरातीमधील पदांकरीता नमूद केलेली शैक्षणिक अर्हता व अनुभव धारण करणे अनिवार्य राहील.

६.१० सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.मासैनो-२०१९/प्र.क्र.२००/२८, दिनांक १७.०७.२०१९ मध्ये माजी सैनिकांच्या अवलंबितांसाठी खालीलप्रमाणे पात्रता निश्चित करण्यात आली आहे.

१. माजी सैनिकांचा मुलगा ज्याचे वय भरतीच्या वेळी ३५ वर्षापर्यंत आहे आणि त्याचा तपशील डिस्चार्ज बुक मध्ये नमूद केलेला आहे. तसेच तो त्या माजी सैनिकावर अवलंबून असला पाहिजे.
२. माजी सैनिकांची अविवाहीत मुलगी, जिचे लग्न झालेले नाही व भरतीच्या वेळी ३५ वर्ष वया खालील असेल, त्याचा उल्लेख डिस्चार्ज बुक मध्ये केलेला असावा, तसेच ती त्या माजी सैनिकावर अवलंबून असली पाहिजे.
३. मुलगा अथवा मुलीचा पार्ट दोन ऑर्डर चा उल्लेख डिस्चार्ज बुक मध्ये नसल्यास पर्यायी कागदपत्रांचे निरिक्षण करुन जसे की आधार कार्ड, रेशन कार्ड, व्होटर कार्ड, इत्यादी नुसार पात्रता ठरविण्यात यावी.
४. माजी सैनिकांच्या विधवा/विवाहीत/घटस्फोटीत मुलींना पाल्य मानले जाणार नाही.
५. माजी सैनिकांच्या पत्नीस व विधवेस नोकरीस पात्र मानले जाईल.
६. माजी सैनिकाने दत्तक घेतलेल्या मुलास अथवा मुलीस वरील १, २, ३ व ४ मधील मापदंड अनुसार पाल्य मानले जाईल. अशा मुलांना/मुलींना दत्तक घेतल्याचे कायदेशीर दस्ताऐवज सादर करणे आवश्यक आहे.

तसेच सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र.मेस्को-२०२४/प्र.क्र.१७/२८(मासैका), दि.२८.०५.२०२४ नुसार दिनांक १७/०७/२०१९ च्या शासन निर्णयातील तरतुदींचा काटेकोरपणे अंमलबजावणी होणेसाठी सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांच्या अधिपत्याखालील क्षेत्रीय कार्यालयाकडून अधिकाधिक आस्थापना, महामंडळे यामध्ये माजी सैनिकांच्या/अवलंबितांच्या रोजगारासाठी विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन मेस्को महामंडळाकडून सेवा घेण्यास प्रोत्साहित करण्याबाबत सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागाने आपल्या स्तरावरुन उचित कार्यवाही करण्यास कळविले आहे.

**७. प्रकल्पग्रस्तांसाठीचे आरक्षण :-**

७.१ शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एईएम-१०८०/३५/१६-अ, दिनांक २१ जानेवारी, १९८० तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी नमूद करण्यात येणाऱ्या आदेशानुसार प्रकल्पग्रस्तांसाठीचे आरक्षण राहील.

७.२ शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक भूकंप-१००९/२०७/२००९/१६-अ, दिनांक २७ ऑगस्ट, २००९ मधील तरतूदीनुसार गुणवत्ता यादीमध्ये येणाऱ्या प्रकल्पग्रस्त उमेदवारांनी सक्षम अधिकारी यांचेकडील प्रकल्पग्रस्त असलेबाबतचे शासकीय नोकरी मिळण्यासाठी विहित केलेले मूळ प्रमाणपत्र कागदपत्रे तपासणीच्या वेळी सादर करणे बंधनकारक राहील.

७.३ निवडसूचीमध्ये समावेश केलेल्या प्रकल्पग्रस्त उमेदवाराचे मूळ प्रमाणपत्र हे संबंधित प्रमाणपत्र निर्गमित करणाऱ्या अधिकारी यांचे कार्यालयाकडून पडताळणी करून घेतले जाईल.

**८. भूकंपग्रस्तांसाठीचे आरक्षण :-**

८.१ शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक भूकंप-१००९/२०७/२००९/१६-अ, दिनांक २७ ऑगस्ट, २००९ तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात येणाऱ्या आदेशानुसार भूकंपग्रस्तांसाठीचे आरक्षण राहील.

८.२ उमेदवाराकडे जिल्हाधिकारी यांनी महाराष्ट्र प्रकल्पग्रस्त व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम, १९८६ नुसार दिलेले प्रमाणपत्र असणे बंधनकारक राहील.

८.३ शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक विकाक २२१५/प्र.क्र.३३७/१६-अ, दिनांक ४ नोव्हेंबर, २०१६ च्या तरतूदीनुसार भूकंपग्रस्तांसाठी राखीव असलेल्या २ % पदांवर नियुक्तीसाठी ज्या कुटुंबातील व्यक्तींचे भूकंपात निधन झाले आहे किंवा ज्यांचे घर पूर्णपणे कोसळले होते, त्यामुळे त्यांना शासनाने नवीन घर बांधून दिले अशा व्यक्तींचे पाल्य नियुक्तीसाठी पात्र ठरतील. तसेच प्रकल्पग्रस्तांसाठी ५ % व भूकंपग्रस्तांसाठी २ % असे स्वतंत्र आरक्षण विहित केलेले असले तरी भरती प्रक्रियेमध्ये भूकंपग्रस्तांसाठी राखीव असलेल्या पदांवर भूकंपग्रस्तांचे पात्र उमेदवार उपलब्ध झाले नाही, तर ती पदे प्रकल्पग्रस्तांसाठी वापरण्यात येतील. अशा प्रकारे भूकंपग्रस्तांसाठी राखीव असलेल्या पदांवर प्रकल्पग्रस्तांची नियुक्ती झाली तर, प्रकल्पग्रस्त उमेदवाराकडे प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र असणे आवश्यक राहील.

८.४ भूकंपग्रस्त / प्रकल्पग्रस्त या घटकाकरीता जाहिरातीत दर्शविलेल्या आरक्षित पदांसाठी पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास ती पदे अन्य पात्र उमेदवारांमधून भरणेबाबत प्रचलित शासन धोरणानुसार कार्यवाही करणेत येईल.

८.५ गुणवत्ता यादीमध्ये येणाऱ्या भूकंपग्रस्त उमेदवारांनी सक्षम अधिकारी यांचेकडील भूकंपग्रस्त असलेबाबतचे शासकीय नोकरी मिळण्यासाठी विहित केलेले मूळ प्रमाणपत्र कागदपत्रे तपासणीच्या वेळी सादर करणे बंधनकारक राहील.

८.६ निवडसूचीमध्ये समावेश केलेल्या भूकंपग्रस्त उमेदवाराचे मूळ प्रमाणपत्र हे संबंधित प्रमाणपत्र निर्गमित करणाऱ्या अधिकारी यांचे कार्यालयाकडून पडताळणी करून घेतले जाईल.

**९. <u>पदवीधर / पदविकाधारक अंशकालीन कर्मचारी आरक्षण</u> :-**

९.१ शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक पअंक-१००९/प्र.क्र.२००/२००९/१६-अ, दिनांक २७ ऑक्टोबर, २००९ नुसार सुशिक्षित बेरोजगारांना अर्थसहाय्य या योजनेअंतर्गत शासकीय कार्यालयामध्ये ३ वर्षांपर्यंत दरमहा मानधनावर काम केलेल्या उमेदवाराने सदरच्या अनुभवाची रोजगार मार्गदर्शक केंद्रामध्ये नोंद केलेली असणे आवश्यक राहील.

९.२ शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक अंशका १९१३/प्र.क्र.५७/२०१३/१६-अ, दिनांक १९ सप्टेंबर, २०१३ नुसार पदवीधर / पदविकाधारक अंशकालीन उमेदवारांच्या आरक्षित पदांवर पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास ती पदे गुणवत्तेनुसार उपलब्ध अन्य पात्र उमेदवारांमधून दि.१६ मार्च, १९९९ रोजीच्या शासन परिपत्रकातील तरतुदीनुसार विहीत केलेल्या कार्यपध्दतीचा अवलंब करुन भरण्यात येतील.

९.३ पदवीधर / पदविकाधारक अंशकालीन उमेदवारांसाठी असलेल्या आरक्षणाचा लाभ घेणाऱ्या उमेदवारांनी शासन सेवेत प्रवेश मिळाल्यास (निवड झाल्यास), त्यांनी त्यांना रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राकडून ३ वर्षाच्या अनुभवाची / अनुभवाबाबत मिळालेले मूळ प्रमाणपत्र व तहसिलदार यांचेकडील प्रमाणपत्र तसेच नियुक्ती आदेशाच्या प्रती पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

**१०. <u>महिला आरक्षण</u> :-**

१०.१ शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग, क्रमांक ८२/२००१/मसेआ२०००/प्र.क्र.४१५/का-२, दिनांक २५ मे, २००१ व त्याबाबत वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार महिला आरक्षण राहील.

१०.२ शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग, क्रमांक महिला२०२३/प्र.क्र.१२३/कार्या-२, दिनांक ०४ मे, २०२३ अन्वये, खुला प्रवर्गातील महिलांकरिता आरक्षित असलेल्या पदावरील निवडीकरीता खुल्या प्रवर्गातील महिला तसेच सर्व मागास प्रवर्गातील महिलांनी नॉन-क्रिमीलेअर प्रमाणपत्र सादर करण्याची अट रद्द करण्यात आली आहे. महिलांसाठी आरक्षित पदांकरिता दावा करणाऱ्या उमेदवारांनी महिला आरक्षणाचा लाभ घ्यावयाचा असल्यास त्यांनी अर्जामध्ये न चुकता महाराष्ट्र अधिवास (Domicile) असल्याबाबत तसेच नॉन क्रिमीलेअर मध्ये मोडत असल्याबाबत (खुला प्रवर्ग/ अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळून) स्पष्टपणे दावा करणे आवश्यक आहे.

१०.३ महिला उमेदवारांनी सादर केलेले नॉन क्रिमीलेअर प्रमाणत्र आयुक्त, महिला व बालविकास विभागाकडून तपासणी करून घेणेत येईल.

१०.४ महिलांकरीता आरक्षित पदावर पात्र महिला उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्या त्या प्रवर्गातील पात्र पुरुष उमेदवारांचा विचार करण्यात येईल.

१०.५ खुला प्रवर्ग/ अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळून अन्य मागास प्रवर्गातील महिलांकरीता आरक्षित असलेल्या पदावर निवडीसाठी दावा करू इच्छिणाऱ्या महिला उमेदवारांनी अर्ज सादर करण्याच्या विहीत केलेल्या अंतिम तारीख ज्या वित्तीय वर्षात येते त्या वित्तीय वर्षातील म्हणजेच सन २०२५-२०२६ चे महाराष्ट्र शासनाच्या सक्षम प्राधिकाऱ्याचे उन्नत व प्रगत व्यक्ती / गटात (नॉन क्रिमीलेअर) मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

**११. खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक :-**

११.१ सदरचे आरक्षण हे खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी लागू करण्यात आलेले आहे.

११.२ खुल्या प्रवर्गाव्यतिरिक्त इतर प्रवर्गातील उमेदवारांना सदर आरक्षणाचा लाभ अनुज्ञेय नाही.

११.३ या आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी अर्जदाराच्या / उमेदवाराच्या कुटूंबाचे एकत्रित वार्षिक उत्पन्न रु.८.०० लाखाच्या आत असले पाहिजे व ती व्यक्ती किंवा तिचे कुटुंबीय महाराष्ट्र राज्यात दिनांक १३ ऑक्टोबर, १९६७ रोजी किंवा त्यापूर्वीचे रहिवासी असणे आवश्यक आहे.

११.४ उमेदवाराकडे सक्षम प्राधिकारी यांनी विहित नमुन्यातील निर्गमित केलेले प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

११.५ शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक राआधो-४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दिनांक १२ फेब्रुवारी, २०१९ व समक्रमांकाचे शासन निर्णय दिनांक ३१ मे, २०२१ अन्वये, "आर्थिकदृष्टया दुर्बल घटक" (EWS) या संवर्गातील उमेदवारांकरीता विहित करण्यात आलेले मूळ प्रमाणपत्र, कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे. आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील उमेदवारांच्या प्रमाणपत्रांचा ग्राह्यता कालावधी शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक राआधो २०२३/प्र.क्र.४०/१६-अ, दिनांक २३ मार्च, २०२३ नुसार समजण्यात येईल.

११.६ "आर्थिकदृष्टया दुर्बल घटक" (EWS) या प्रवर्गाच्या आरक्षणासदर्भात शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्यात येईल.

**१२. सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास आरक्षण :-**

महाराष्ट्र राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाकरीता आरक्षण अधिनियम २०२४ च्या अनुषंगाने शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक बीसीसी/प्र.क्र.७५/१६-ब, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२४ अन्वये, सामाजिक व शैक्षणिक मागासवर्गाकरीता आरक्षण विहित करण्यात आले असून शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक बीसीसी-२०२४/प्र.क्र.७५/आरक्षण-५, दिनांक २८ जून, २०२४ व दिनांक ०५ जुलै, २०२४ नुसार नमुन्यातील जात प्रमाणपत्र व नॉन क्रिमीलेअर (उन्नत गटात मोडत नसल्याबाबतचे) प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

**१३. अर्ज भरणे व सादर करणेबाबत आवश्यक सूचना :-**

१३.१ उमेदवारांनी अर्ज भरण्यापूर्वी https://mmrda.maharashtra.gov.in (Division → Administration → Recruitment) या लिंकवर जाऊन जाहिरात सविस्तर अभ्यासावी.

अर्ज भरताना एखादा तांत्रिक मुद्दा उपस्थित झाल्यास किंवा तशी परिस्थिती उद्भवल्यास उमेदवारांनी टाटा कन्सल्टन्सी सर्विसेस (Tata Consultancy Services) च्या ९१-९५१३१६५५८६ या क्रमांकावर संपर्क साधावा. कार्यालयीन वेळ सकाळी ०९.०० ते सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत (शनिवार / रविवार (साप्ताहिक सुट्टया))

१३.२ उमेदवारांना अर्ज सादर करताना जाहिराती संबंधित काही समस्या उद्भवल्यास मुं.म.प्र.वि.प्राधिकरणाच्या (vacancymmrda@mailmmrda.maharashtra.gov.in) या ई-मेलवर अथवा दूरध्वनी क्र. : ०२२ - ६५९६ ४०००/७७००/७४०० या हेल्पलाईनवर संपर्क साधावा. कार्यालयीन वेळ सकाळी ०९.३० ते सायंकाळी ०६.०० वाजेपर्यंत (शनिवार / रविवार (साप्ताहिक सुट्टया))

१३.३ ऑनलाईन फी भरणेची अंतिम मुदत दि.२० मार्च, २०२६, वेळ २३.५९ वा. पर्यंत राहील.

१३.४ अर्जात हेतूपुरस्सर खोटी माहिती देणे किंवा खरी माहिती दडवून ठेवणे किंवा त्यात बदल करणे किंवा पाठविलेल्या दाखल्यांच्या प्रतीतील नोंदीत अनधिकृतपणे खाडाखोड करणे किंवा खाडाखोड केलेले वा बनावट दाखले सादर करणे, परीक्षा कक्षातील गैरवर्तन, परीक्षेचे वेळी नक्कल करणे, वशीला लावण्याचा प्रयत्न करणे यासारखे अथवा परीक्षा कक्षाचे बाहेर अथवा परीक्षेनंतरही गैरप्रकार करणाऱ्या उमेदवारांना गुण कमी करणे, विशिष्ट किंवा सर्व परीक्षांना वा निवडींना अपात्र ठरविणे, इत्यादी यापैकी प्रकरणपरत्वे योग्य त्या शिक्षा करणेचा तसेच प्रचलित कायदा व नियमांचे अनुषंगाने योग्य ती कारवाई करणेचे अधिकार महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांना राहतील. तसेच विहित केलेल्या अर्हतेच्या अटी पूर्ण न करणारा अथवा गैरवर्तणूक करणारा उमेदवार कोणत्याही टप्यावर निवड होण्यास अपात्र ठरेल. तसेच निवड झाल्यानंतर देखील सेवा समाप्तीस पात्र ठरेल.

१३.५ वयाच्या पुराव्यासाठी सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेला जन्माचा दाखला, शाळा सोडल्याचा दाखला, माध्यमिक (एस.एस.सी.) परिक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र ग्राह्य समजण्यात येईल.

१३.६ शैक्षणिक अर्हतेसंदर्भात आवश्यक ती माहिती दिलेल्या क्रमाने नमूद करावी. संबंधित परीक्षेच्या गुणपत्रकावरील दिनांक हा शैक्षणिक अर्हता धारण केल्याचा दिनांक समजण्यात येईल व त्याआधारे उमेदवाराची पात्रता ठरविणेत येईल.



RojgarMarathi.com

१३.७ गुणांऐवजी श्रेणी पध्दत असल्यास कागदपत्र पडताळणीचे वेळी उमेदवारांनी गुणपत्रकासोबत श्रेणीची यादी सादर करावी.

१३.८ प्रोफाईल निर्मिती / प्रोफाईल अद्यावत करणे.
या लिंकवर वापरकर्त्यांने प्रोफाईल निर्मिती करण्याकरीता "नवीन वापरकर्त्यांची नोंदणी" ("Click here for New Registration") वर क्लिक केल्यानंतर यंत्रणा लॉग-इन पृष्ठ प्रदेर्शित करेल. नवीन खाते (वापरकर्त्याचे नाव Login व Password) निर्माण करण्यासाठी लॉग-इन पृष्ठाद्वारे विचारलेली सर्व माहिती भरून नोंदणीची प्रक्रिया पूर्ण करावी.

१३.९ उमेदवारांकडे नित्य वापरात असेल असा ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक असणे आवश्यक आहे. तसेच भरतीप्रक्रिये दरम्यान पत्रव्यवहार, प्रवेशपत्र आणि इतर माहिती ऑनलाईन देण्यात येणार असल्याकारणामुळे भरती प्रक्रियेच्या संपूर्ण कालावधीमध्ये नोंदणीकृत सदर ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक वैध / कार्यरत राहणे आवश्यक आहे. उमेदवाराने चुकीची माहिती भरल्यास प्राधिकरण जबाबदार राहणार नाही.

**१४. परीक्षा शुल्काचा भरणा करणे (ऑनलाईन मोड) :-**

१४.१ डेबिट कार्ड (Rupay / Visa / Master Card / Maestro), क्रेडिट कार्ड, इंटरनेट बँकिंग, IMPS, कॅश कार्ड्स / मोबाईल वॉलेट वापरुन पेमेंट केले जाऊ शकते.

१४.२ व्यवहार यशस्वीरित्या पूर्ण झाल्यावर ई-पावती तयार होईल.

१४.३ ई-पावती तयार न होणे अयशस्वी फी प्रदान दर्शविते.

१४.४ उमेदवारांनी ई-पावती आणि तपशिल असलेल्या ऑनलाईन अर्जाची प्रिंट आऊट घेणे आवश्यक आहे.

**१५. छायाचित्र, स्वाक्षरी व कागदपत्रे अपलोड (Upload of Photo / Signature / Documents) करण्यासाठी मार्गदर्शक तत्वे :-**

ऑनलाईन अर्ज करण्यापूर्वी उमेदवाराने खाली दिलेल्या वैशिष्ट्यांनुसार त्याचा / तिचा फोटो, स्वाक्षरी असणे आवश्यक आहे.

१५.१ छायाचित्र प्रतिमा :-

१५.१.१ "फोटोची स्कॅन केलेली प्रत" अपलोड करणे

- अलीकडील पासपोर्ट आकाराचा फोटो (४.५ सेमी लांबी x ३.५ सेमी रुंदी) रंगित छायाचित्रात
- हलक्या रंगाच्या, शक्यतो पांढऱ्या पार्श्वभूमीच्या विरुध्द घेतलेले असावे.
- टोपी आणि गडद चष्मा स्वीकार्य नाहीत.
- फाईलचा आकार ८० KB - २०० KB दरम्यान असावा.

१५.१.२ "संगणकाच्या कॅमेऱ्याने घेतलेला प्रत्यक्ष (लाईव्ह) फोटो" अपलोड करणे

- **पार्श्वभूमी (Background):** पांढऱ्या पार्श्वभूमीसमोर उभे राहा किंवा बसा. (इतर कोणत्याही वस्तू किंवा विचलित करणारी पार्श्वभूमी टाळा).
- **व्यक्ती:** फोटोमध्ये इतर कोणत्याही वस्तू किंवा इतर व्यक्ती नसाव्यात. फोटोमध्ये तुम्ही एकटेच आहात याची खात्री करा.
- **चेहरा आणि पोझ:** फोटोमध्ये तुमचा पूर्ण चेहरा, कान, मान आणि खांदे स्पष्ट दिसले पाहिजेत. तुमचा चेहरा थेट कॅमेऱ्यासमोर असावा, डोळे उघडे ठेवून थेट कॅमेऱ्याकडे पहावे आणि चेहऱ्यावरील हावभाव तटस्थ (Neutral) असावेत (हसू नये).
- **फ्रेमिंग:** या फोटोमध्ये शरीराचा खांद्याखालील कोणताही भाग समाविष्ट नसावा.

१५.२ स्वाक्षरी : स्वाक्षरीची स्कॅन केलेली प्रत अपलोड करणे

- रंगीत छायाचित्रात स्वाक्षरी (४.५ सेमी लांबी x ३.५ सेमी रुंदी)
- फाईलचा आकार ८० KB - २०० KB दरम्यान असावा.

१५.३ कागदपत्रे स्कॅन करणे :

- स्कॅनर रेझोल्यूशन किमान 200 dpi वर सेट करा.
- रंग true colour सेट करा.

Rojgar Marathi.com

१५.४ कागदपत्रे अपलोड करण्याची प्रक्रिया :

ऑनलाईन अर्ज भरताना उमेदवाराला छायाचित्र, स्वाक्षरी अपलोड करण्यासाठी स्वतंत्र लिंक प्रदान केल्या जातील. संबंधित लिंकवर क्लिक करा छायाचित्र / स्वाक्षरी अपलोड करा.
*तुमचा फोटो, स्वाक्षरी, अपलोड केल्याशिवाय तुमचा ऑनलाईन अर्ज नोंदणीकृत होणार नाही.

१. छायाचित्रातील चेहरा किंवा स्वाक्षरी अस्पष्ट असल्यास उमेदवाराचा अर्ज नाकारला जाऊ शकतो.
२. ऑनलाईन अर्जामध्ये छायाचित्र / स्वाक्षरी अपलोड केल्यानंतर उमेदवारांनी प्रतिमा स्पष्ट आहेत आणि योग्यरित्या अपलोड केल्या आहेत हे तपासावे.
३. उमेदवाराने हे सुनिश्चित केले पाहिजे की अपलोड करावयाचा फोटो आवश्यक आकाराचा आहे आणि चेहरा स्पष्टपणे दिसला पाहिजे.

टिप : ऑनलाईन नोंदणी केल्यानंतर उमेदवारांनी त्यांच्या प्रणालीद्वारे तयार केलेल्या ऑनलाईन अर्जाची प्रिंटआऊट घ्यावी.

## १६. अर्ज भरणेबाबत सूचना :-

१६.१ नोंदणी व अर्ज भरण्याची प्रक्रिया उमेदवाराने स्वत: काळजीपूर्वक करणे आवश्यक आहे.

१६.२ अर्ज मराठी व इंग्रजीमध्ये उपलब्ध करून देण्यात आला असला, तरी संगणक प्रक्रियेकरिता अर्ज इंग्रजीमध्ये भरणे आवश्यक आहे. संक्षिप्तपणे (Abbreviations) या अद्याक्षरे (Initials) न देता संपूर्ण नाव व संपूर्ण पत्ता नमूद करावा. नावाच्या / पत्त्याच्या दोन भागांमध्ये एका स्पेसने जागा सोडावी.

१६.३ महिला उमेदवारांनी त्यांच्या नावात काही बदल असल्यास (लग्नापूर्वीचे नाव, लग्नानंतरचे नाव) त्यासंदर्भात आवश्यक कागदपत्रे, विवाह नोंदणी दाखला कागदपत्रे पडताळणी करुन जमा करणे आवश्यक आहे. तसेच एस.एस.सी. अथवा तत्सम प्रमाणपत्रांवरील नावाप्रमाणे अर्ज भरावेत. त्यानंतर नाव बदलले असल्यास अथवा प्रमाणपत्रातील नावात कोणत्याही प्रकारचा बदल झाला असल्यास, त्यासंबंधीच्या बदलासंदर्भातील राजपत्राची प्रत कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करावी.

१६.४ पत्रव्यवहारासाठी स्वतःचा पत्ता इंग्रजीमध्ये लिहावा. व्यावसायिक मार्गदर्शन केंद्र, स्वयं अध्ययन मार्गदर्शन केंद्र / वर्ग अथवा तत्सम स्वरुपाच्या कोणत्याही मार्गदर्शक केंद्राचा / संस्थेचा पत्ता पत्रव्यवहारासाठी देवू नये.

१६.५ अर्जामध्ये दिलेली माहिती व मूळ कागदपत्रे तपासणी दरम्यान काही कागदपत्रे संशयास्पद वाटली अथवा सादर केलेल्या कागदपत्रांतील माहिती व मूळ अर्जातील माहिती यामध्ये फरक आढळून आल्यास अर्जामध्ये भरलेली माहिती खोटी आहे असे समजण्यात येईल. आवश्यकतेनुसार मूळ शैक्षणिक / इतर कागदपत्रांची संबंधित शैक्षणिक विद्यापीठ / संस्था यांच्याकडे तपासणी करण्यात येईल. तसेच उमेदवार अर्जामधील माहिती संदर्भातील कागदोपत्री पुरावे सादर करु न शकल्यास / न मिळाल्यास उमेदवाराची उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

१६.६ उमेदवाराने अर्जावर केलेली स्वाक्षरी ही त्याच्या प्रवेशपत्रावर / उपस्थिती पत्रावर एकाच प्रकारची असेल याची दक्षता घ्यावी. तसेच उमेदवाराने ऑनलाईन अर्जावर अपलोड केलेले छायाचित्र वरील प्रमाणे सर्व ठिकाणी एकच असेल याची दक्षता घ्यावी.

१६.७ अर्ज सादर केलेल्या उमेदवारांस प्राथमिक छाननीच्या आधारे परीक्षेस बसण्याची परवानगी देण्यात येईल. त्यामुळे उमेदवार परीक्षा उत्तीर्ण झाला तरी आवश्यक ती शैक्षणिक व इतर अर्हता असल्याशिवाय व आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता केल्याशिवाय निवडीस पात्र राहणार नाही. केवळ परीक्षा उत्तीर्ण झाल्यामुळे उमेदवारांस निवडीचा कोणताही हक्क प्राप्त होणार नाही. त्यामुळे उमेदवारांनी पात्रतेच्या अटी अभ्यासूनच अर्ज करावा. उमेदवाराने अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे परीक्षेला बोलविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही.

१६.८ विहित दिनांकानंतर व विहित वेळेनंतर आलेला कोणताही अर्ज संगणकीय प्रणाली मध्ये स्विकृत केला जाणार नाही.

१६.९ वय, शैक्षणिक अर्हता, मागासवर्ग / नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र, दिव्यांग, महिला, माजी सैनिक, अनाथ, प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त, अशंकालीन कर्मचारी, खेळाडू, अनुभव, पात्रता व ज्या दिव्यांग उमेदवारास मदतनीस घ्यावयाचा आहे इत्यादी संदर्भात न चुकता अर्जामध्ये स्पष्टपणे / निर्विवादपणे दावा करणे आवश्यक आहे. अर्जातील संबंधित रकान्यात स्पष्टपणे दावा केलेला नसल्यास, संबंधित दाव्याचा विचार केला जाणार नाही. उमेदवाराने अर्ज सादर केल्यानंतर त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल करता येणार नाही.

१६.१० ज्या उमेदवारांनी यापूर्वी त्यांचे नाव रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र / सेवायोजन कार्यालय / समाजकल्याण / आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी / जिल्हा सैनिक बोर्ड / अपंग कल्याण कार्यालय इत्यादी कार्यालयात नोंदविलेले आहे अशा उमेदवारांनी देखील स्वतंत्ररित्या ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक राहील. तसेच प्रकल्पग्रस्त, अंशकालीन इत्यादी समांतर आरक्षणांतर्गत येणाऱ्या उमेदवारांनी स्वंतत्रपणे अर्ज ऑनलाईन सादर करणे आवश्यक आहे.

**१७. परिक्षा शुल्क व परिक्षा केंद्राविषयी नियमावली :-**

१७.१ खुल्या प्रवर्गाच्या उमेदवारांसाठी रु.१,०००/-
मागासप्रवर्गाच्या उमेदवारांसाठी रु.९००/-
अनाथ उमेदवारांसाठी रु.९००/-
माजी सैनिक / दिव्यांग माजी सैनिक यांचेसाठी परीक्षा शुल्क माफ राहील.

१७.२ परीक्षा शुल्क फक्त ऑनलाईन पध्दतीनेच भरणा करण्यात यावे. परीक्षा शुल्क ना परतावा (Non-Refundable) आहे.

१७.३ उमेदवारास प्रसिध्द केलेल्या जाहिरातीमधील एकापेक्षा अधिक पदांकरीता अर्ज करावयाचे असल्यास अशा प्रत्येक पदांसाठी स्वतंत्र अर्ज सादर करून त्यासाठी स्वतंत्र परीक्षा शुल्क भरणे बंधनकारक राहील.

१७.४ प्रवेश पत्रामध्ये नमूद केलेल्या परीक्षा केंद्रावर "ऑनलाईन" (Computer Based Test) पध्दतीने परीक्षा वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपात घेतली जाईल.

१७.५ परीक्षा केंद्र, परीक्षेचे ठिकाण, दिनांक, वेळ व सत्र इत्यादी बाबत बदल करण्याची विनंती मान्य केली जाणार नाही.

१७.६ मुं.म.प्र.वि.प्राधिकरणास परीक्षा केंद्र रद्द अथवा नवीन केंद्र समाविष्ट इत्यादी बाबतचे अंतिम अधिकार असतील. तसेच प्राधिकरणास उमेदवाराने मागणी केलेल्या परीक्षा केंद्र व्यतिरिक्त केंद्र देण्याचा अधिकार असेल.

१७.७ एखादया परीक्षा केंद्रावर पुरेसे उमेदवार "ऑनलाईन" परीक्षेसाठी उपस्थित न राहिल्यास किंवा केंद्रावर क्षमतेपेक्षा अधिक उमेदवार झाल्यास प्राधिकरणास उमेदवाराचे परीक्षा केंद्र बदलण्याचा अधिकार असेल.

१७.८ सर्व उमेदवारांनी खालील कागदपत्रांसह ऑनलाईन परीक्षेला उपस्थित राहणे आवश्यक आहे. खालीलपैकी कोणतेही कागदपत्रे नसल्यास उमेदवारास परीक्षेला उपस्थित राहू दिले जाणार नाही.

- परीक्षेसाठीचे वैध प्रवेशपत्र.
- मूळ फोटो ओळखपत्र.
- फोटो ओळखपत्राची छायांकित प्रत.
- परीक्षा शुल्क ऑनलाईन भरल्याची ई-पावती.

**१८. ओळख पटवणे :-**

१८.१ परीक्षा केंद्रावर प्रवेशपत्रासह उमेदवाराचे ओळख पटवणारे व उमेदवाराचा अलीकडील फोटो चिकटवलेले वैध फोटो ओळखपत्र जसे पॅनकार्ड (Pan Card) / पारपत्र (Passport) / वाहनचालक परवाना (Driving License) / मतदार ओळखपत्र (Voter ID) / फोटो सहीत आधारकार्ड, बँकेचे फोटो सहीतचे पासबुक, महाविद्यालय / विद्यापीठाचे अलीकडील मॅच ओळखपत्र / कर्मचारी ओळखपत्र / फोटोसहित असणारे बार काउन्सिलचे ओळखपत्र हे समवेक्षक / पर्यवेक्षकाला सादर करणे आवश्यक आहे. उमेदवाराची ओळखही उमेदवाराचे प्रवेशपत्र, हजेरीपत्रक / उपस्थितीपत्रक आणि त्याने सादर केलेल्या कागदपत्रांच्या आधारे पटविली जाईल. जर उमेदवाराची ओळख पटविणे बाबत काही शंका उपस्थित झाल्यास किंवा ओळख शंकास्पद असल्यास त्याला परिक्षेसाठी उपस्थित राहू दिले जाणार नाही.

१८.२ परीक्षेच्या व्यवस्थापनामध्ये काही समस्या येण्याची शक्यता पूर्णपणे नाकारता येत नाही, ज्यामुळे ऑनलाईन चाचणी वितरणावर तसेच निकालावर परिणाम होऊ शकतो. अशा वेळी या समस्यांचे निराकरण करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील. तथापि, यामध्ये उमेदवारांची हालचाल व परीक्षेला विलंब होणे यासारख्या बाबी गृहीत धरण्यात आलेल्या आहेत. परीक्षेचे फेर आयोजन हे समितीच्या / परीक्षा आयोजित करणाऱ्या संस्थेच्या पूर्ण निर्णयावर अवलंबून राहील. परीक्षेच्या फेर आयोजनासाठी उमेदवारांचा कोणताही दावा राहणार नाही. चाचणी वितरणाची विलंबित प्रक्रिया न स्विकारणारे, हालचालीस नकार देणारे किंवा अशा प्रक्रियेत सहभागी होण्यास इच्छूक नसलेले उमेदवार सरसकटपणे निवड प्रक्रियेतून बाद ठरविले जातील.

१८.३ परीक्षेशी संबंधित सर्व बाबींमध्ये मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा निर्णय अंतिम असेल आणि तो उमेदवारावर बंधनकारक असेल. यासंदर्भात प्राधिकरणाकडून कोणताही पत्रव्यवहार किंवा वैयक्तिक चौकशी केली जाणार नाही.

१८.४ उमेदवाराने मूळ प्रवेशपत्राची छायापत्र व ओळखपत्राची छायापत्र परीक्षा हॉल मध्ये जमा करणे आवश्यक राहील.

१८.५ रेशनकार्ड, शिकाऊ वाहनपरवाना ओळखपत्र म्हणून ग्राह्य धरला जाणार नाही.

१८.६ उमेदवारांना परीक्षेसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

१८.७ परीक्षेला उशिरा येण्याबाबत :-

परीक्षेच्या प्रवेशपत्रात परीक्षेला हजर राहण्यासाठी दिलेल्या वेळेनंतर येणाऱ्या उमेदवारांना परीक्षेला उपस्थित राहू दिले जाणार नाही. प्रवेश पत्रावरील परीक्षेसाठी उपस्थित राहण्यासाठी वेळ ही प्रत्यक्ष परीक्षा सुरु होण्याच्या आधीची असणार आहे. परीक्षेची वेळ जरी २ तास (१२० मिनिटे) असली तरी, उमेदवारांना विविध प्राथमिक औपचारीकता पूर्ण करण्यासाठी जसे की, सूचना देणे, उमेदवारास ओळख पटवणे, आवश्यक विविध कागदपत्रांची पडताळणी, आवश्यक कागदपत्रे जमा करणे इत्यादी बाबीं पूर्ण करण्यासाठी उमेदवाराने प्रवेशपत्रावर नमूद केलेल्या वेळेच्या किमान १ तास आधी परीक्षा केंद्रावर उपस्थित रहाणे बंधनकारक आहे. परीक्षेच्या ३० मिनिटे आधी परीक्षा केंद्रावरील प्रवेश बंद करण्यात येणार असल्यामुळे, त्यानंतर येणाऱ्या उमेदवारांना परीक्षेस बसण्यास परवानगी देण्यात येणार नाही.

१८.८ निवड प्रक्रिये दरम्यान गैरवर्तणूक / अनुचितप्रकार / गैरप्रकार करताना दोषी आढळलेल्या उमेदवारां विरुध्द करण्यात येणारी कार्यवाही :-

उमेदवाराने त्याच्या हितासाठी खोटी व चुकीची माहिती / तपशिल देवू नये, खोटी माहिती तथा खोटा तपशिल तयार करुन सादर करु नये किंवा कोणतीही माहिती ऑनलाईन अर्ज भरताना दडवून ठेवू नये. जर उमेदवाराने खोटी माहिती तथा खोटा तपशिल तयार करून सादर केला तर उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल व योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल.
(टिप :-उमेदवाराने परीक्षेला उपस्थित राहताना स्वतःची ओळख पटविण्यासाठीची आवश्यकती मूळ कागदपत्रे, त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती परीक्षेच्या प्रवेशपत्रासह सादर करणे आवश्यक आहे. परीक्षेच्या प्रवेशपत्रावरील नाव (परीक्षेसाठी नोंदणी केल्यानुसार) सोबत सादर करण्यात येणाऱ्या ओळखपत्राशी तंतोतंत जुळणे आवश्यक आहे. **ज्या महिला उमेदवारांच्या पहिल्या / मधल्या / शेवटच्या नावात विवाहानंतर फरक पडला असेल त्यांना याबाबत विशेष खबरदारी घेणे आवश्यक आहे. सदर महिला उमेदवारांनी नावात बदल झाल्याबाबतचे राजपत्र / विवाह नोंदणी प्रमाणपत्र यापैकी एक पुरावा सादर करणे आवश्यक आहे.** परीक्षेचे प्रवेशपत्र व सादर करण्यात आलेले फोटो ओळखपत्र यामधील नावात कोणतीही तफावत आढळल्यास उमेदवारास परीक्षेला उपस्थित राहू दिले जाणार नाही.)

**१९. परीक्षेच्या वेळेत किंवा एकूण निवड प्रक्रिये दरम्यान जर उमेदवाराने :-**

१९.१ अनुचित प्रकार करणे किंवा,

१९.२ तोतयेगिरी करणे किंवा तोतयांच्या सेवा वापरणे किंवा,

१९.३ परीक्षेच्या ठिकाणी गैरवर्तणूक करणे किंवा परीक्षेच्या पेपर मधील माहिती किंवा तत्संबंधी काही माहिती कोणत्याही कारणासाठी पूर्ण किंवा त्याचा काही भाग तोंडी किंवा लेखी किंवा इलेक्ट्रॉनिकली किंवा मेकॅनिकली उघड करणे, प्रकाशित करणे, पाठवणे, साठवणे किंवा,

१९.४ स्वतःच्या उमेदवारीबद्दल अनियमित किंवा, भ्रमणध्वनी किंवा, स्वतःच्या उमेदवारीबद्दल गैरमार्गाने पाठिंबा मिळविणे किंवा तत्सम इलेक्ट्रॉनिक साधने यांचा वापर परीक्षेच्या ठिकाणी करणे.

१९.५ परीक्षा कक्षातील परीक्षा नियंत्रण अधिकारी यांच्याशी अरेरावी करणे, उध्दटपणे वागणे, त्यांना लाच देऊ पाहणे.

१९.६ अशा कृत्यांमध्ये दोषी आढळल्यास अशा उमेदवारास फौजदारी कारवाईस सामोरे जावे लागेल तसेच सदर उमेदवारास परीक्षेसाठी अपात्र ठरविले जाईल.

१९.७ मुं.म.प्र.वि.प्राधिकरणामार्फत पुढील कालावधीत घेण्यात येणाऱ्या कोणत्याही परीक्षेसाठी बसण्यापासून काही ठराविक कालावधीसाठी किंवा कायमचे प्रतिरोधित (Debarred) केले जाईल.

**२०. परीक्षेचे संक्षिप्त स्वरुप :-**

| अ. क्र. | पदनाम | भाग-१ मराठी | भाग-२ इंग्रजी | भाग-३ सामान्य ज्ञान | भाग-४ बौध्दिक चाचणी | भाग-५ तांत्रिक | एकूण प्रश्न | एकूण गुण | परीक्षेचा कालावधी (मिनिटे) | व्यावसायिक चाचणी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | एकूण प्रश्न | एकूण प्रश्न | एकूण प्रश्न | एकूण प्रश्न | एकूण प्रश्न | | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| १. | **सहाय्यक अभियंता श्रेणी-१ (स्थापत्य)** | २० | २० | १० | १० | ४० | १०० | २०० | १२० मिनिटे | -- |
| | काठिण्य पातळी | पदवी | पदवी | पदवी | पदवी | स्थापत्य विषयक व पदवी दर्जाचे प्रश्न | | | | |
| | प्रश्न पत्रिकेचे माध्यम | मराठी | इंग्रजी | मराठी व इंग्रजी | मराठी व इंग्रजी | इंग्रजी | | | | |

Rojgar Marathi.com
एमएमआरडीए MMRDA

| अ. क्र. | पदनाम | भाग-१ मराठी | भाग-२ इंग्रजी | भाग-३ सामान्य ज्ञान | भाग-४ बौध्दिक चाचणी | भाग-५ तांत्रिक | एकूण प्रश्न | एकूण गुण | परीक्षेचा कालावधी (मिनिटे) | व्यावसायिक चाचणी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | एकूण प्रश्न | एकूण प्रश्न | एकूण प्रश्न | एकूण प्रश्न | एकूण प्रश्न | | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| | **सहाय्यक अभियंता श्रेणी-१ (रेलपथ)** | २० | २० | १० | १० | ४० | | | | |
| २. | काठिण्य पातळी | पदवी | पदवी | पदवी | पदवी | रेलपथ विषयक व पदवी दर्जाचे प्रश्न | १०० | २०० | १२० मिनिटे | -- |
| | प्रश्न पत्रिकेचे माध्यम | मराठी | इंग्रजी | मराठी व इंग्रजी | मराठी व इंग्रजी | इंग्रजी | | | | |
| | **सहाय्यक अभियंता श्रेणी-१ (संकेत व दूरसंचार)** | २० | २० | १० | १० | ४० | | | | |
| ३. | काठिण्य पातळी | पदवी | पदवी | पदवी | पदवी | संकेत व दूरसंचार विषयक व पदवी दर्जाचे प्रश्न | १०० | २०० | १२० मिनिटे | -- |
| | प्रश्न पत्रिकेचे माध्यम | मराठी | इंग्रजी | मराठी व इंग्रजी | मराठी व इंग्रजी | इंग्रजी | | | | |
| | **उप नियोजक** | २० | २० | १० | १० | ४० | | | | |
| ४. | काठिण्य पातळी | पदवी | पदवी | पदवी | पदवी | नियोजन विषयक व पदवी दर्जाचे प्रश्न | १०० | २०० | १२० मिनिटे | -- |
| | प्रश्न पत्रिकेचे माध्यम | मराठी | इंग्रजी | मराठी व इंग्रजी | मराठी व इंग्रजी | इंग्रजी | | | | |
| | **सहाय्यक भूमी व मिळकत व्यवस्थापक** | २० | २० | १० | १० | ४० | | | | |
| ५. | काठिण्य पातळी | पदवी | पदवी | पदवी | पदवी | विधी/ मिळकत व्यवस्थापन विषयक व पदवी दर्जाचे प्रश्न | १०० | २०० | १२० मिनिटे | -- |
| | प्रश्न पत्रिकेचे माध्यम | मराठी | इंग्रजी | मराठी व इंग्रजी | मराठी व इंग्रजी | इंग्रजी | | | | |
| | **सहाय्यक अभियंता श्रेणी-२/कनिष्ठ अभियंता (स्थापत्य)** | २० | २० | १० | १० | ४० | | | | |
| ६. | काठिण्य पातळी | पदवी | पदवी | पदवी | पदवी | स्थापत्य विषयक व पदवी दर्जाचे प्रश्न | १०० | २०० | १२० मिनिटे | -- |
| | प्रश्न पत्रिकेचे माध्यम | मराठी | इंग्रजी | मराठी व इंग्रजी | मराठी व इंग्रजी | इंग्रजी | | | | |
| | **सहाय्यक अभियंता श्रेणी-२/कनिष्ठ अभियंता (रेलपथ)** | २० | २० | १० | १० | ४० | | | | |
| ७. | काठिण्य पातळी | पदवी | पदवी | पदवी | पदवी | रेलपथ विषयक व पदवी दर्जाचे प्रश्न | १०० | २०० | १२० मिनिटे | -- |
| | प्रश्न पत्रिकेचे माध्यम | मराठी | इंग्रजी | मराठी व इंग्रजी | मराठी व इंग्रजी | इंग्रजी | | | | |

| अ. क्र. | पदनाम | भाग-१ मराठी<br>एकूण प्रश्न | भाग-२ इंग्रजी<br>एकूण प्रश्न | भाग-३ सामान्य ज्ञान<br>एकूण प्रश्न | भाग-४ बौध्दिक चाचणी<br>एकूण प्रश्न | भाग-५ तांत्रिक<br>एकूण प्रश्न | एकूण प्रश्न | एकूण गुण | परीक्षेचा कालावधी (मिनिटे) | व्यावसायिक चाचणी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| ८. | **सहाय्यक अभियंता श्रेणी-२/कनिष्ठ अभियंता (विद्युत)** | २० | २० | १० | १० | ४० | १०० | २०० | १२० मिनिटे | -- |
| | काठिण्य पातळी | पदवी | पदवी | पदवी | पदवी | विद्युत विषयक व पदवी दर्जाचे प्रश्न | | | | |
| | प्रश्न पत्रिकेचे माध्यम | मराठी | इंग्रजी | मराठी व इंग्रजी | मराठी व इंग्रजी | इंग्रजी | | | | |
| ९. | **सहाय्यक अभियंता श्रेणी-२/कनिष्ठ अभियंता (संकेत व दूरसंचार)** | २० | २० | १० | १० | ४० | १०० | २०० | १२० मिनिटे | -- |
| | काठिण्य पातळी | पदवी | पदवी | पदवी | पदवी | संकेत व दूरसंचार विषयक व पदवी दर्जाचे प्रश्न | | | | |
| | प्रश्न पत्रिकेचे माध्यम | मराठी | इंग्रजी | मराठी व इंग्रजी | मराठी व इंग्रजी | इंग्रजी | | | | |
| १०. | **सहाय्यक समाज विकास अधिकारी** | २० | २० | १० | १० | ४० | १०० | २०० | १२० मिनिटे | -- |
| | काठिण्य पातळी | पदवी | पदवी | पदवी | पदवी | सामाजिक कार्य विषयक व पदवी दर्जाचे प्रश्न | | | | |
| | प्रश्न पत्रिकेचे माध्यम | मराठी | इंग्रजी | मराठी व इंग्रजी | मराठी व इंग्रजी | इंग्रजी | | | | |
| ११. | **सहाय्यक विधी अधिकारी** | २० | २० | १० | १० | ४० | १०० | २०० | १२० मिनिटे | -- |
| | काठिण्य पातळी | पदवी | पदवी | पदवी | पदवी | कायदे विषयक व पदवी दर्जाचे प्रश्न | | | | |
| | प्रश्न पत्रिकेचे माध्यम | मराठी | इंग्रजी | मराठी व इंग्रजी | मराठी व इंग्रजी | इंग्रजी | | | | |
| १२. | **उद्यान विद्या सहाय्यक** | २० | २० | १० | १० | ४० | १०० | २०० | १२० मिनिटे | -- |
| | काठिण्य पातळी | पदवी | पदवी | पदवी | पदवी | कृषी,उद्यान , विद्या, आणि वनशास्त्र विषयक व पदवी दर्जाचे प्रश्न | | | | |
| | प्रश्न पत्रिकेचे माध्यम | मराठी | इंग्रजी | मराठी व इंग्रजी | मराठी व इंग्रजी | इंग्रजी | | | | |
| १३. | **उप लेखापाल** | १० | १० | १५ | १५ | ५० | १०० | २०० | १२० मिनिटे | -- |
| | काठिण्य पातळी | पदवी | पदवी | पदवी | पदवी | वित्त / लेखा विषयक व पदवी दर्जाचे प्रश्न | | | | |
| | प्रश्न पत्रिकेचे माध्यम | मराठी | इंग्रजी | मराठी व इंग्रजी | मराठी व इंग्रजी | इंग्रजी | | | | |

Rojgar Marathi.com
एमएमआरडीए MMRDA

| अ. क्र. | पदनाम | भाग-१ मराठी | भाग-२ इंग्रजी | भाग-३ सामान्य ज्ञान | भाग-४ बौद्धिक चाचणी | भाग-५ तांत्रिक | एकूण प्रश्न | एकूण गुण | परीक्षेचा कालावधी (मिनिटे) | व्यावसायिक चाचणी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | एकूण प्रश्न | एकूण प्रश्न | एकूण प्रश्न | एकूण प्रश्न | एकूण प्रश्न | | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| १४ | **लघुटंकलेखक** | १५ | १५ | १५ | १५ | -- | ६० | १२० | ७५ मिनिटे | ८० गुण व्यावसायिक चाचणी |
| | काठिण्य पातळी | १० वी | १० वी | १० वी | १० वी | | | | | |
| | प्रश्न पत्रिकेचे माध्यम | मराठी | इंग्रजी | मराठी व इंग्रजी | मराठी व इंग्रजी | | | | | |
| १५. | **भूमापक** | १० | १० | १५ | १५ | १५ | ६० | १२० | ७५ मिनिटे | ८० गुण व्यावसायिक चाचणी |
| | काठिण्य पातळी | १० वी | १० वी | १० वी | १० वी | भूमापन विषयक व १० वी दर्जाचे प्रश्न | | | | |
| | प्रश्न पत्रिकेचे माध्यम | मराठी | इंग्रजी | मराठी व इंग्रजी | मराठी व इंग्रजी | इंग्रजी | | | | |
| १६. | **संगणक तंत्रज्ञ** | २० | २० | १० | १० | ४० | १०० | २०० | १२० मिनिटे | -- |
| | काठिण्य पातळी | १२ वी | १२ वी | १२ वी | १२ वी | संगणक विषयक व १२ वी दर्जाचे प्रश्न | | | | |
| | प्रश्न पत्रिकेचे माध्यम | मराठी | इंग्रजी | मराठी व इंग्रजी | मराठी व इंग्रजी | इंग्रजी | | | | |

२०.१ परीक्षेसाठी मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान, संबंधित विषयज्ञान या विषयावर वस्तुनिष्ठ बहुपर्यायी प्रश्न असतील सदर परीक्षेचा दर्जा हा संबंधित पदाकरीता विहित करण्यात आलेल्या किमान शैक्षणिक अर्हतेनुसार तसेच संबंधित पदासाठी आवश्यक असलेल्या कौशल्य तपासणीस पूरक राहील.

२०.२ जाहिरातीमध्ये नमूद पदाकरिता अर्ज केलेल्या परीक्षेकरीता पात्र ठरलेल्या उमेदवारांचे परीक्षेचे प्रवेशपत्र (Hall Ticket) https://mmrda.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर परीक्षेच्या १५ (पंधरा) दिवस अगोदर त्यांच्या प्रोफाईलद्वारे उपलब्ध करून देण्यात येतील. उमेदवारांनी परीक्षा प्रवेशपत्र स्वतः संकेतस्थळावरून काढून घ्यावे.

परीक्षेच्या वेळी उमेदवाराने प्रवेशपत्राचा प्रिंट व ओळखीचा पुरावा (छायाप्रतीसह) सोबत ठेवणे बंधनकारक आहे. त्याशिवाय कोणत्याही उमेदवारांस परीक्षेस बसण्यास परवानगी दिली जाणार नाही. परीक्षेनंतर प्रस्तुत प्रवेशपत्र स्वतःजवळ जपून ठेवावे व परीक्षा कक्षात प्रवेशपत्र व ओळखीच्या पुराव्याची छायाप्रत जमा करावी.

परीक्षा केंद्राची शहरे उपलब्धतेनुसार निश्चित केली जातील.

२०.३ परीक्षा केंद्र प्रवेश पत्रावर ठरवून दिल्याप्रमाणे असतील. अर्जदाराने मागणी केलेल्या केंद्राव्यतिरिक्त अन्य / नवीन केंद्र दिले जाऊ शकते. याबाबत कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

२०.४ परीक्षेनंतर आवश्यकतेनुसार संभाव्य निवडसूची क्षेत्रातील उमेदवारांना विहीत प्रमाणात कागदपत्रे / प्रमाणपत्रे पडताळणीकरीता बोलाविण्यात येईल.

२०.५ **स्पर्धा परिक्षेतून गुणवत्ता प्राप्त झालेल्या उमेदवारांची विहित कागदपत्रे / प्रमाणपत्रे पडताळणीअंती प्रचलित नियमानुसार, "व्यावसायिक परिक्षेकरीता पात्र यादी" सोबत, व्यावसायिक चाचणी घेण्याबाबतचे स्थळ, दिनांक व वेळापत्रक स्वतंत्रपणे प्राधिकरणाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.**

२०.६ काही अपरिहार्य कारणास्तव परीक्षेच्या तारखांमध्ये / परीक्षेच्या ठिकाणामध्ये बदल करावा लागल्यास त्याबाबतची माहिती https://mmrda.maharashtra.gov.in संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल, याबाबत लेखी स्वरूपात कोणत्याही प्रकारे पत्रव्यवहार केले जाणार नाही.

२०.७ सामान्यीकरण प्रक्रिया (Normalisation Method) :- एकाच दिवशी, एकापेक्षा जास्त सत्रांमध्ये किंवा अनेक दिवसात, एकापेक्षा जास्त सत्रांमध्ये परीक्षा घ्यावी लागली तर परीक्षेचा प्रथम दिवस ते अंतिम दिवस तसेच सत्र ०१ ते अंतिम सत्र याबाबत सामान्यीकरण प्रक्रिया (Normalisation Method) करण्यात येईल.

२०.८ Groupwise Time Setter :- बहुपर्यायी वस्तुनिष्ठ ऑनलाईन परीक्षेमध्ये प्रत्येक विषयामधील सोपे, मध्यम व कठीण प्रश्न, गटामध्ये अंतर्भूत करुन त्यानुसार प्रत्येक गटासाठी वेळ निश्चित करुन त्याप्रमाणे परीक्षेमध्ये **"ग्रुप लेवल टायमरची"** अंमलबजावणी करण्यात येईल.

## २१. उमेदवारांना समान गुण मिळाल्यास :-

उमेदवारांना ऑनलाईन परीक्षेमध्ये समान गुण मिळाल्यास परीक्षेचा निकाल तयार करताना गुणवत्ता यादीमधील प्राधान्यक्रम पुढीलप्रमाणे राहील.

I. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या पाल्यास प्रथम प्राधान्य राहील.

II. समान गुण प्राप्त उमेदवारांमध्ये आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याचा पाल्य नसेल अथवा वरील अ.क्र.(I) नुसार एकापेक्षा अधिक उमेदवार समान गुण प्राप्त असतील तर त्यापैकी वयाने ज्येष्ठ असलेल्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.

III. वरील अ.क्र.(I) व (II) या दोन्ही अटींमध्ये देखील समान ठरत असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत जाहिरात प्रसिद्ध केलेल्या दिनांकाचे किंवा तत्पूर्वीचे उच्चतर शैक्षणिक अर्हता (पदव्युत्तर पदवीधर, पदवीधर, उच्च माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण, माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण अशा प्रकारे) धारण करणाऱ्या उमेदवारास प्राधान्यक्रम देण्यात येईल.

IV. वरील अ.क्र.(I), (II) व (III) या तिन्ही अटींमध्ये समान ठरत असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत, सदर पदाच्या सेवाप्रवेश नियमामध्ये विहित असलेल्या किमान शैक्षणिक अर्हतेमध्ये उच्चतरगुण प्राप्त उमेदवारास प्रथम प्राधान्यक्रम देण्यात येईल.

V. सेवाप्रवेश नियम / जाहिरात / अधिसूचनेमध्ये अनुभव विहित केल्याप्रमाणे, जाहिरात प्रसिद्ध केलेल्या दिनांकाचे किंवा तत्पूर्वीचे धारण करीत असलेल्या विहित अनुभवाचा कालावधी विचारात घेण्यात येईल.

VI. वरील निकष लावूनही उमेदवारांचा गुणवत्ताक्रम समान येत असल्यास अशा उमेदवारांचा गुणवत्ताक्रम त्यांच्या आडनावाच्या आद्याक्षरानुसार निश्चित करण्यात येईल.

टिप :- आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याचा पाल्य म्हणजे शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्रमांक एससीवाय-१२०५/प्र.क्र.१८९/म-७, दिनांक २३ जानेवारी, २००६ अन्वये गठीत करण्यात आलेल्या जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समितीने ज्या कुटूंबास शेतकऱ्याच्या आत्महत्याप्रकरणी मदतीसाठी पात्र ठरविले असेल अशा कुटूंबातील मृत शेतकऱ्याचा पाल्य (पत्नी / मुलगा / मुलगी) होय.

## २२. वयोमर्यादा :-

| वयोमर्यादा गणण्याचा दिनांक | किमान वयोमर्यादा | कमाल वयोमर्यादा | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | खुला / मागासवर्गीय / आ.दु.घ. / सा.व.शै.मा. | खुला | मागासवर्गीय / अनाथ / आ.दु.घ. | प्राविण्य प्राप्त खेळाडु (खुला) / मागासवर्गीय / अनाथ / आ.दु.घ. / सा.व.शै.मा. | दिव्यांग माजी सैनिक, भूकंपग्रस्त, प्रकल्पग्रस्त | माजी सैनिक | दिव्यांग उमेदवार | पदवीधर अंशकालीन उमेदवार |
| जाहिरात प्रसिद्ध केलेल्या दिनांकाचे किंवा तत्पूर्वीचे | १८ | ३८ | ४३ | ४३ | ४५ | सैनिकी सेवेचा कालावधी अधिक ३ वर्षे | ४५ | ५५ |

२२.१ वयोमर्यादा गणण्याचा दिनांक :- जाहिरात प्रसिद्ध केलेली दिनांक

२२.२ जाहिरात प्रसिद्ध केलेल्या दिनांकापर्यंत उमेदवाराचे वय ग्राह्य धरण्यात येईल.

२२.३ प्रस्तुत जाहिरातीस अनुसरुन जाहिरात प्रसिद्ध केलेल्या दिनांकापर्यंत संबंधित शैक्षणिक अर्हता / पात्रता धारण करणे आवश्यक आहे.

२२.४ मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातील कायम आस्थापनेवर कार्यरत असलेल्या अधिकारी / कर्मचारी यांना वयाची अट शिथिलक्षम राहील.

२२.५ शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही-२००२/३७९/प्र.क्र.२२/०२/१२, दिनांक ०१ नोव्हेंबर, २००३ मधील तरतूदीनुसार, ज्या पदांकरीता काही वर्षाचा अनुभव आवश्यक आहे. अशा पदांकरीता सेवाप्रवेश नियमातील कमाल वयोमर्यादा + संबंधित पदास विहित केलेल्या अनुभवाचा कालावधी इतपत किंवा पदाच्या विशेषज्ञतेनुसार व आवश्यकतेनुसार मागासवर्गीय उमेदवारांसाठी ५० वर्षे मर्यादेपर्यंत व खुला प्रवर्गातील उमेदवारांसाठी ४५ वर्षे मर्यादेपर्यंत अशी वयोमर्यादा फक्त शासन सेवेतील अधिकारी / कर्मचारी यांच्याकरीता विहित करण्यात येत आहे.

Rojgar Marathi.com

**२३.** **जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र :-**

२३.१ जातीच्या दाव्याच्या पृष्ठ्यर्थ महाराष्ट्र अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती, विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), विशेष मागास प्रवर्ग व इतर मागास वर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्यांच्या पडताळणीचे विनियम) अधिनियम २००० मधील तरतुदीनुसार, उमेदवारांना संबंधित आरक्षणाचा लाभ घ्यावयाचा असल्यास सक्षम प्राधिकाऱ्याने निर्गमित केलेले जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

२३.२ जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास, शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक बीसीसी-२०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६-ब, दिनांक १२ डिसेंबर, २०११ मधील तरतुदीनुसार, याचिका क्र.२१३६/२०११ व अन्य याचिकांवर मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिनांक २५ ऑगस्ट, २०११ रोजी दिलेल्या आदेशाच्या विरोधात मा.सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे दाखल केलेल्या एसएलपी मधील आदेशाच्या अधीन राहून तात्पुरते नियुक्ती आदेश निर्गमित केल्याच्या दिनांकापासून ०६ महिन्याचे आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

२३.३ ज्या उमेदवाराची निवड विशिष्ट मागासप्रवर्गासाठी राखीव असलेल्या जागेवर झाली आहे. तथापि, जातवैधता प्रमाणपत्र सादर केलेले नाही अशा उमेदवारांना त्यांचे जात प्रमाणपत्राची वैधता तपासणीच्या अधिन राहून संबंधिताची नियुक्ती देण्यात येईल. तथापि नियुक्ती आदेश प्राप्त झालेल्या उमेदवारांनी त्यांचे नियुक्तीच्या दिनांकापासून ६ महिन्यांच्या आत जात प्रमाणपत्राची वैधता संबंधित जात पडताळणी समितीकडून पडताळणी करुन घेणे आवश्यक राहील. ६ महिन्यांच्या आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास उमेदवार असमर्थ ठरल्यास अथवा जात प्रमाणपत्र समितीने / सक्षम प्राधिकाऱ्याने जात प्रमाणपत्र अवैध ठरविल्यास त्या उमेदवाराची नियुक्ती / निवड तात्काळ पुर्वलक्षी प्रभावाने रद्द करण्यात येईल तसेच संबंधित उमेदवाराविरोधात आवश्यकतेनुसार कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

२३.४ सामाजिक आरक्षणाच्या अनुषंगाने, आरक्षणाचा लाभ घेवू इच्छिणाऱ्या मागास प्रवर्गातील उमेदवारांनी जाहिरात प्रसिद्ध केलेल्या दिनांकापर्यंत वैध असलेले सक्षम प्राधिकाऱ्याकडून पडताळणी करण्यात आलेले जातीचा दाखला प्रमाणपत्र कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

**२४.** **लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन :-**

महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम २००५ मधील तरतूदीनुसार, शासकीय सेवेतील भरती मध्ये विहित नमुन्यातील प्रतिज्ञापन नियुक्ती वेळेस हजर होताना विवाहित उमेदवारांनी सादर करणे बंधनकारक राहील. प्रतिज्ञापनामध्ये नमूद केल्यानुसार हयात असलेल्या अपत्यांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दि.२८ मार्च, २००६ व तद्नंतर जन्माला आलेल्या अपत्यामुळे उमेदवार शासकीय सेवेच्या नियुक्तीसाठी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल. या नियमातील व्याख्येनुसार लहान कुटुंबाचा अर्थ दोन अपत्यांसह पत्नी व पती असा आहे.

**२५.** **निवडप्रक्रिया :-**

२५.१ जाहिराती मध्ये नमूद अर्हता / पात्रते विषयक अटी किमान असून किमान अर्हता धारण केली म्हणून उमेदवार शिफारशीसाठी पात्र असणार नाही.

२५.२ सेवाभरतीची संपूर्ण प्रक्रिया मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (कर्मचारी नेमणूका मार्गदर्शक तत्वे) विनियम, १९८४ अन्वये अथवा तदनंतर शासनाकडून वेळोवेळी करण्यात येणाऱ्या सुधारणा, शासनाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेले शासन निर्णय / तरतूदीनुसार राबविण्यात येईल.

**२६.** **दिव्यांग उमेदवारांकरीता मार्गदर्शक सूचना :-**

२६.१ दृष्टिहीन व ज्यांच्या लेखन गतीवर कायमस्वरूपी प्रतिकूल परिणाम झालेला आहे असे उमेदवार ऑनलाईन परीक्षे दरम्यान खालील मुद्दा क्र.२६.११ आणि २६.१२ मध्ये नमूद मर्यादेच्या अधीन राहून लेखनिकाचा वापर करू शकतात. जेथे लेखनिक वापरला जातो अशा सर्व प्रकरणांसाठी खालील नियम लागू होतील.

२६.२ लक्षणीय दिव्यांगत्व असलेल्या परिक्षार्थी यांना स्पर्धा परीक्षेस बसताना लेखनाची अडचण तसेच लेखनाची गती कमी असल्यास त्यांनी केलेल्या मागणी नुसार दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ मधील कलम २ (आर) नुसार लक्षणीय (Benchmark) दिव्यांग व्यक्तींच्या वर्गवारी मधील अंधत्व / शारीरिक दिव्यांगत्व (दोन्ही हात बाधित / नसलेली) / मेंदुचा पक्षाघात असलेल्या दिव्यांग परिक्षार्थी लेखनिक यांची सुविधा वापरू शकतात.

२६.३ लक्षणीय दिव्यांगत्व असलेल्या उमेदवारांना परीक्षेच्यावेळी लेखनिक व इतर सोयी सवलती उपलब्ध करून देण्यासंदर्भात शासन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग परिपत्रक क्रमांक दिव्यांग-२०१९/प्र.क्र.२००/दि.क.२, दिनांक ०५ ऑक्टोबर, २०२१ अन्वये जारी करण्यात आलेल्या लक्षणीय (Benchmark) दिव्यांग व्यक्तीबाबतच्या लेखी परीक्षा घेण्याबाबतची मार्गदर्शिका - २०२१ तसेच तद्नंतर शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

२६.४ प्रत्यक्ष परीक्षेच्यावेळी उत्तरे लिहिण्यासाठी सक्षम नसलेल्या, पात्र दिव्यांग उमेदवारांना, लेखनिकाची मदत आणि / अथवा अनुग्रह कालावधीची आवश्यकता असल्यास संबंधित उमेदवाराने ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर केल्याच्या दिनांकापासून सात (०७) दिवसाच्या आत आवश्यक प्रमाणपत्र / कागदपत्रांसह विहित नमुन्यामध्ये मुं.म.प्र.वि.प्राधिकरणाच्या (vacancymmrda@mailmmrda.maharashtra.gov.in) या ई-मेलवर लेखी विनंती करून पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे.

२६.५ उमेदवाराला त्याच्या / तिच्या स्वखर्चाने स्वत:च्या लेखनिकाची व्यवस्था करावी लागेल.

२६.६ लेखनिक यांची शैक्षणिक पात्रता सदर परिक्षेकरिता असलेल्या किमान शैक्षणिक पात्रते पेक्षा कमी असावी आणि उमेदवाराच्या शैक्षणिक पात्रतेपेक्षा एका टप्प्याने कमी असावी.

२६.७ उमेदवाराने निवडलेला लेखनिक हा त्याच परीक्षेसाठी उमेदवार नसावा. निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर वरील नियमांचे उल्लंघन आढळून आल्यास, उमेदवार आणि लेखनिक या दोघांची उमेदवारी रद्द केली जाईल. परीक्षेत लेखनिकाच्या सेवा वापरण्यास पात्र व इच्छित उमेदवारांनी ऑनलाईन अर्जामध्ये तसे नमूद करणे आवश्यक राहील. ऑनलाईन अर्जामध्ये तसे नमूद नसल्यास नंतर लेखनिक वापरण्याची केलेली कोणतीही विनंती विचारात घेतली जाणार नाही.

२६.८ लेखनिक म्हणून सेवा देणारी व्यक्ती एकापेक्षा जास्त उमेदवारांना लेखनिक म्हणून सेवा देऊ शकणार नाही. त्याबाबत उमेदवाराने आवश्यकती काळजी घ्यावी.

२६.९ लेखनिक उपरोल्लिखित सर्व विहित अर्हतेचे निकषांची पूर्तता करीत असल्याचे हमी पत्र व आवश्यक वैद्यकीय प्रमाणपत्र उमेदवाराने परीक्षा सुरु होण्यापूर्वी पर्यवेक्षक / केंद्र प्रमुख यांचेकडे द्यावे लागेल. तद्नंतर जर उमेदवार किंवा लेखनिक विहित अर्हतेच्या निकषांची पूर्तता करीत नसल्याचे आढळून आल्यास किंवा त्यांनी मुलभूत माहिती दडविली असल्याचे निष्पन्न झाल्यास ऑनलाईन परीक्षेच्या निकालाची पर्वा न करता, अर्जदाराची उमेदवारी रद्द केली जाईल.

२६.१० जे उमेदवार लेखनिकाचा वापर करतात त्यांना परीक्षेच्या प्रत्येक तासासाठी २० मिनिटे अतिरिक्त वेळ भरपाई म्हणून देण्यात येईल. परीक्षे दरम्यान लेखनिकाने स्वत:हून प्रश्नांची उत्तर देऊ नयेत. असे कोणतेही वर्तन आढळल्यास अर्जदाराची उमेदवारी रद्द केली जाईल.

२६.११ उमेदवारांना दिलेल्या भरपाईचा वेळ संगणक प्रणालीवर आधारित असल्याने ज्या उमेदवारांनी अर्ज करताना लेखनिकाची सेवा घेणार असल्याचे नमूद केलेले आहे, अशा नोंदणीकृत उमेदवारांनाच अतिरिक्त वेळ देण्यात येईल. भरपाईच्या वेळेसाठी नोंदणीकृत नसलेल्या अन्य उमेदवारांना ऐन वेळी अशा सवलतींना परवानगी दिली जाणार नाही.

२६.१२ परीक्षेदरम्यान कोणत्याही टप्यावर लेखनिक स्वतंत्रपणे प्रश्नांची उत्तरे देत असल्याचे आढळल्यास, संबंधित उमेदवाराचे परीक्षा सत्र समाप्त केले जाईल आणि उमेदवाराची उमेदवारी रद्द केली जाईल. परीक्षा संपन्न झाल्यानंतरही जर परीक्षेदरम्यान लेखनिकाच्या सेवेचा स्वतंत्रपणे प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी वापर केल्याचे परीक्षा प्रशासनास आढळून आल्यास अशा उमेदवारांची उमेदवारी देखील रद्द केली जाईल.

२६.१३ परीक्षेकरीता लेखनिकाची मदत आणि / अथवा अनुग्रह कालावधीची परवानगी दिलेल्या पात्र उमेदवारांची यादी प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल. तसेच लेखनिकाची मदत आणि अथवा अनुग्रह कालावधीच्या परवानगीबाबत संबंधित उमेदवाराला नोंदणीकृत ई-मेलवर कळविण्यात येईल.

२६.१४ अस्थिव्यंग आणि मेंदूचा पक्षाघात असलेल्या उमेदवारांसाठी मार्गदर्शक सूचना :-
अस्थिव्यंग आणि मेंदूचा पक्षाघात (किमान ४० % दिव्यांगत्व) असलेल्या उमेदवारांनी आवेदन पत्रामध्ये तसे नमूद केलेले असल्यास त्यांना प्रति तास २० मिनिटे अतिरिक्त वेळ दिला जाईल.

२६.१५ दृष्टिहीन उमेदवारांसाठी मार्गदर्शक सूचना :-
दृष्टिहीन (ज्यांना ४० % अथवा त्यापेक्षा जास्त दिव्यांगत्व आहे) उमेदवार परीक्षेसाठी मॅग्निफाइड फॉन्टची सुविधा उपलब्ध करण्याचा पर्याय घेऊ शकतात. तसेच अशा उमेदवारांना भरपाई म्हणून दर तासासाठी अतिरिक्त २० मिनिटे देण्यात येतील.

२६.१६ सदरची मार्गदर्शक तत्वे केंद्र / महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी जाहिर केलेल्या सूचनांनुसार / निर्णयानुसार असून त्यामध्ये शासनाने बदल केल्यास ते बदल लागू राहतील.

२६.१७ प्रत्यक्ष परीक्षेच्यावेळी लेखनिक व अनुग्रह कालावधीचा लाभ घेण्यास इच्छुक असलेल्या दिव्यांग उमेदवारांनी प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातीस अनुसरुन अर्ज सादर करण्यापूर्वी प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या दिव्यांग उमेदवारांकरीता मार्गदर्शक सूचनाचे अवलोकन करणे उमेदवारांचे हिताचे राहील.

RojgarMarathi.com

## २७. निवडसुचीची कालमर्यादा :-

२७.१ शासन निर्णय, क्रमांक प्रानिमं १२२२/प्र.क्र.५४/का.१३-अ, दि.०२ डिसेंबर, २०२५ अन्वये, निवड समितीने तयार केलेली निवडसुची २ वर्षासाठी किंवा नवीन सूची तयार करण्यासाठी सेवाभरतीची जाहिरात देण्यात येईल, त्या दिनांकापर्यंत यापैकी जो दिनांक आधी घडेल, त्या दिनांकापर्यंत विधीग्राह्य धरेल. तसेच ही मुदतवाढ निवडसूची तयार करताना ज्या दिनांकापर्यंतची रिक्त पदे विचारात घेण्यात आली आहेत, त्या पदांपुरतीच असेल.

२७.२ निवड समितीने तयार केलेल्या निवडसुचीमधून ज्येष्ठतेनुसार उमेदवारांची नियुक्तीसाठी शिफारस केल्यानंतर शिफारस केलेला उमेदवार सदर पदावर विहित मुदतीत रुजू न झाल्यास किंवा संबंधित पदाच्या सेवाप्रवेश नियमातील तरतुदीनुसार किंवा जात प्रमाणपत्र / अन्य आवश्यक प्रमाणपत्रांची अनुपलब्धता / अवैधता किंवा अन्य कोणत्याही कारणास्तव नियुक्तीसाठी पात्र ठरत नसल्याचे आढळून आल्यास अथवा शिफारस केलेला उमेदवार रूजू झाल्यानंतर नजीकच्या कालावधीत त्याने राजीनामा दिल्यामुळे किंवा त्याचा मृत्यू झाल्याने पद रिक्त झाल्यास, अशी पदे त्या – त्या प्रवर्गाच्या निवडसुचीतील प्रतिक्षा यादीतील उमेदवारांमधून निवडसुचीच्या कालमर्यादेत वरिष्ठतेनुसार उतरत्या क्रमाने भरण्यात येतील. मात्र, अशी कार्यवाही निवडसुचीच्या कालमर्यादेत करण्यात येईल.

## २८. निवड पध्दत :-

२८.१ परिक्षा ऑनलाईन पध्दतीने (Computer Based Test) वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपात घेण्यात येणार आहे.

२८.२ पदास आवश्यक असलेली अर्हता अथवा अनुभव शिथिल केला जाणार नाही.

२८.३ परिक्षेनंतर पात्र उमेदवारांना मिळालेल्या गुणांची यादी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

२८.४ उमेदवार विशिष्ट पदावर नेमणूक होण्यास कितपत योग्य आहे आणि त्याची मानसिक क्षमता किती आहे, ते आजमावणेकरिता परीक्षेच्या वेळी विचारण्यात येणाऱ्या प्रश्नांमध्ये इतर प्रश्नांबरोबरच ज्यासाठी अर्ज केलेला असेल त्या पदाची कर्तव्ये जबाबदाऱ्या उमेदवाराने ज्ञानाच्या ज्या विशिष्ट क्षेत्रातील विशेषज्ञता प्राप्त केली असेल त्या क्षेत्रातील अद्ययावत घडामोडी व त्याला असलेली माहिती आणि जनतेच्या समस्या या संबंधीचे प्रश्न यांचाही समावेश असेल.

२८.५ पात्र ठरणाऱ्या उमेदवारांची संख्या विचारात घेऊन संभाव्य निवड क्षेत्रामध्ये येणाऱ्या उमेदवारांना कागदपत्रे तपासणीकरीता पाचारण करण्यात येईल. त्याबाबतची यादी व वेळापत्रक मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल तसेच ई-मेलद्वारे संबंधित उमेदवारांना कळविण्यात येईल.

२८.६ जाहिरातीस अनुसरुन प्राप्त झालेल्या अर्जांची संख्या वाजवी प्रमाणापेक्षा जास्त असेल आणि अर्ज सादर केलेल्या सर्व पात्र उमेदवारांच्या परीक्षा घेणे सोयीस्कर नसल्यास परीक्षेसाठी उमेदवारांची संख्या मर्यादित करण्याच्या दृष्टीने जाहिरातीत दिलेल्या शैक्षणिक अर्हता आणि / अथवा अनुभव यापेक्षा जादा शैक्षणिक अर्हता / अनुभव किंवा अन्य योग्य निकष यांच्या आधारे निकष निश्चित करुन अंतिम परीक्षेस पात्र उमेदवारांची संख्या मर्यादित करण्यात येईल.

२८.७ जाहिरातीमधील सर्व पदांसाठी संगणक आधारित परिक्षेद्वारे (Computer Based Online Examination) घेण्यात येणाऱ्या ऑनलाईन परिक्षेत प्राप्त गुणांच्या आधारे गुणवत्तेनुसार उमेदवारांची गुणवत्ता यादी तयार केली जाईल. गुणवत्ता यादीत अंतर्भाव होण्यासाठी उमेदवाराने किमान ४५ % गुण प्राप्त करणे आवश्यक राहील. गुणवत्ता यादीतील उमेदवारांमधून गुणवत्तेनुसार पात्र उमेदवारांची निवडसूची (निवड यादी व प्रतिक्षा यादी) तयार करण्यात येईल.

२८.८ जाहिरातीमधील लघुटंकलेखक व भूमापक या पदांसाठी संगणक आधारित परिक्षेमध्ये (Computer Based Online Examination) किमान ४५ % गुण प्राप्त करणाऱ्या उमेदवारांची व्यावसायिक चाचणी घेण्यात येईल. व्यावसायिक चाचणी घेण्याबाबतचे स्थळ, दिनांक व वेळापत्रक स्वतंत्रपणे संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. लेखी परिक्षा व व्यावसायिक चाचणी यामध्ये उमेदवारांनी प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल. गुणवत्ता यादीत अंर्तभाव होण्यासाठी किमान ४५ % गुण प्राप्त करणे आवश्यक राहील. गुणवत्ता यादीतील उमेदवारांमधून गुणवत्तेनुसार पात्र उमेदवारांची निवडसूची (निवड यादी व प्रतिक्षा यादी) तयार करण्यात येईल.

२८.९ शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक प्रतिम-१२२२/प्र.क्र.५४/का.१३-अ, दिनांक ०४ मे, २०२२ अन्वये, गट-ब (अराजपत्रित), गट-क व गट-ड मधील कोणत्याही पदासाठी उमेदवारांची निवड करताना मौखिक परीक्षा घेतली जाणार नाही.

Rojgar Marathi.com

२८.१० निवडसूची ही प्रवर्ग निहाय तयार करण्यात येईल व त्यामध्ये समाविष्ट करावयाच्या उमेदवारांची संख्या पुढीलप्रमाणे असेल :-

| प्रवर्ग निहाय रिक्त पदांची संख्या | निवडसूचीमध्ये समाविष्ट करावयाच्या उमेदवारांची संख्या |
|---|---|
| १ | ३ |
| २ ते ४ | रिक्त पदे अधिक रिक्त पदांच्या १०० टक्के किंवा ५ यापैकी जे अधिक असेल ते. |
| ५ ते ९ | रिक्त पदे अधिक रिक्त पदांच्या ५० टक्के किंवा १० यापैकी जे अधिक असेल ते. |
| १० ते ४९ | रिक्त पदे अधिक रिक्त पदांच्या ३० टक्के किंवा १५ यापैकी जे अधिक असेल ते. |
| ५० किंवा त्याहुन अधिक | रिक्त पदे अधिक रिक्त पदांच्या २५ टक्के. |

वरीलप्रमाणे अतिरिक्त उमेदवारांच्या संख्येची परिगणना करताना उमेदवारांची संख्या अपूर्णांकात येत असल्यास पुढील संख्या विचारात घेण्यात येईल.

## २९. सेवाप्रवेशोत्तर शर्ती :-

नियुक्त झालेल्या व्यक्तीस खालील अर्हता / परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील :-

२९.१ ज्या पदांकरीता प्रचलित नियमानुसार विभागीय / व्यावसायिक परीक्षा विहित केली असेल अथवा आवश्यक असेल तेथे त्यासंबंधी केलेल्या नियमानुसार विभागीय / व्यावसायिक परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

२९.२ हिंदी आणि मराठी भाषा परीक्षेसंबधी केलेल्या नियमानुसार जर ती व्यक्ती अगोदर परीक्षा उत्तीर्ण झाली नसेल किंवा तिला उत्तीर्ण होण्यातून सूट मिळाली नसेल तर भाषा संचालनालयाची परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

२९.३ शासन नियमानुसार नियुक्तीसाठी पात्र असणाऱ्या उमेदवारांना जिल्हा शल्यचिकित्सक यांच्याकडून वैद्यकिय तपासणी करुन घ्यावी लागेल.

२९.४ चारित्र्य-पुर्व चारित्र्य पडताळणी अंती आक्षेपार्ह बाबी आढळून आल्यास संबंधित उमेदवार नियुक्तीसाठी / सेवेसाठी पात्र राहणार नाही. तसेच कोणत्याही टप्प्यावर असे उमेदवार अपात्र ठरतील.

२९.५ शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक प्रशिक्षण-२०००/प्र.क्र.६१/२००१/३६ दिनांक १९ मार्च, २००३ तसेच शासन निर्णय, माहिती व तंत्रज्ञान विभाग (सा.प्र.वि.), क्रमांक मातंस-२०१२/प्र.क्र.२७७/३९, दिनांक ०४ फेब्रुवारी, २०१३, शासन पूरकपत्र, दिनांक ०८ जानेवारी, २०१८ व दिनांक १६ जुलै, २०१८ अथवा महाराष्ट्र शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहित केलेले संगणक हाताळणी / वापरण्याबाबतचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील.

२९.६ निवड झालेल्या उमेदवाराने रुजू होते वेळी परिविक्षाधीन पदावर नियुक्ती केल्यापासून तीन वर्षापर्यंत प्राधिकरणाच्या सेवेचा राजीनामा देणार नाही किंवा नोकरी सोडून जाणार नाही, तसेच तीन वर्षाची सेवा पूर्ण होण्यापूर्वी नोकरी सोडल्यास, सहा महिन्याच्या पूर्ण वेतना (Gross Payment) एवढी रक्कम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास देण्यास बाध्य राहीन असे बंधपत्र सादर करणे आवश्यक आहे. सेवेत रुजू झाल्यानंतर उमेदवारांना मुं.म.प्र.वि.प्राधिकरणास राजीनामा द्यावयाचा असल्यास, गट अ मधील उमेदवारांना ३ महिन्यांची आणि गट ब व क मधील उमेदवारांना एक महिन्याची पूर्व सूचना देणे व व्यवस्थापनाची पूर्व मंजूरी घेणे त्यांच्यावर बंधनकारक राहील.

## ३०. विहित कागदपत्रे / प्रमाणपत्रे संलग्न (Upload) करणे :-

३०.१ विविध सामाजिक व समांतर आरक्षणाचा दावा करणाऱ्या उमेदवारांनी जाहिरातीनुसार पात्र ठरत असल्यास ऑनलाईन अर्ज सादर करताना खालील कागदपत्रे / प्रमाणपत्रे (लागू असलेली) संलग्न (Upload) करणे अनिवार्य आहे :-

| क्र. | प्रमाणपत्र / कागदपत्र | फाईल फॉमेट |
|---|---|---|
| १. | अर्जातील नावाचा पुरावा (एस.एस.सी. अथवा तत्सम शैक्षणिक अर्हता). | JPEG, JPG, PNG, PDF |
| २. | वयाचा पुरावा. | JPEG, JPG, PNG, PDF |
| ३. | शैक्षणिक अर्हता इत्यादीचा पुरावा. | JPEG, JPG, PNG, PDF |
| ४. | सामाजिकदृष्टया मागासवर्गीय असल्याबाबतचा पुरावा. | JPEG, JPG, PNG, PDF |
| ५. | आर्थिकदृष्टया दुर्बल घटक असल्याबाबतचा पुरावा. | JPEG, JPG, PNG, PDF |
| ६. | जाहिरात प्रसिद्ध केलेल्या दिनांकापर्यंत वैध असणारे नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र. | JPEG, JPG, PNG, PDF |
| ७. | पात्र दिव्यांग व्यक्ती असल्याचा पुरावा. | JPEG, JPG, PNG, PDF |
| ८. | पात्र माजी सैनिक असल्याचा पुरावा. | JPEG, JPG, PNG, PDF |

| | | |
|---|---|---|
| ९. | खेळाडू आरक्षणाकरीता पात्र असल्याचा पुरावा. | JPEG, JPG, PNG, PDF |
| १०. | अनाथ आरक्षणासाठी पात्र असल्याचा पुरावा. | JPEG, JPG, PNG, PDF |
| ११. | प्रकल्पग्रस्त आरक्षणासाठी पात्र असल्याचा पुरावा. | JPEG, JPG, PNG, PDF |
| १२. | भूकंपग्रस्त आरक्षणासाठी पात्र असल्याचा पुरावा. | JPEG, JPG, PNG, PDF |
| १३. | अंशकालीन पदवीधर कर्मचारी आरक्षणासाठी पात्र असल्याचा पुरावा. | JPEG, JPG, PNG, PDF |
| १४. | अराखीव महिला, मागासवर्गीय, आ.दु.घ., खेळाडू, दिव्यांग, माजी सैनिक, अनाथ, प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त, अंशकालीन पदवीधर कर्मचारी आरक्षणाचा दावा असल्यास अधिवास प्रमाणपत्र. | JPEG, JPG, PNG, PDF |
| १५. | एस.एस.सी.नावात बदल झाल्याचा पुरावा. | JPEG, JPG, PNG, PDF |
| १६. | मराठी भाषेचे ज्ञान असल्याचा पुरावा. | JPEG, JPG, PNG, PDF |
| १७. | लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन | JPEG, JPG, PNG, PDF |
| १८. | अनुभव प्रमाणपत्र. | JPEG, JPG, PNG, PDF |

३०.२ खेळाडू, दिव्यांग, माजी सैनिक, अनाथ तसेच प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त व पदवीधर अंशकालीन कर्मचारी आरक्षणाच्या दाव्यांच्या अनुषंगाने प्रमाणपत्रे / कागदपत्रे संलग्न (Upload) केल्याशिवाय अर्ज स्विकृत केला जाणार नाही.

३०.३. अंतिम निवड यादीतील पात्र उमेदवारांनी सादर केलेल्या विविध प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रती मुळ प्रमाणपत्रे आधारे कागदपत्रे तपासणीवेळी तपासण्यात येतील. सदर प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रती मूळ प्रमाणपत्राच्या आधारे कागदपत्र तपासण्याच्या वेळी उपलब्ध करून देणे उमेदवारांना बंधनकारक राहील. त्यामधील प्रमाणपत्रे खोटी किंवा चुकीची आढळल्यास संबंधित उमेदवारास अपात्र ठरवण्यात येईल.

**३१. सर्वसाधारण सूचना :-**

३१.१ अर्ज विहित मुदतीत फक्त ऑनलाईन अर्ज प्रणालीद्वारे स्विकारण्यात येतील.

३१.२ अर्ज सादर करण्याकरीता संकेतस्थळ :- https://mmrda.maharashtra.gov.in (Division → Administration → Recruitment)

३१.३ भरती प्रक्रियासंदर्भातील सर्व कार्यक्रम, वेळापत्रक, वेळापत्रकातील बदल, सूचना वगैरे प्राधिकरणाच्या https://mmrda.maharashtra.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येतील. कोणत्याही वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द झालेली जाहिरात तसेच कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द होणारी जाहिरात यामध्ये तफावत विसंगती आढळून आल्यास कार्यालयाच्या संकेतस्थळावरील जाहिरात अधिकृत समजण्यात येईल.

३१.४ अर्ज सादर केल्यानंतर विहित मुदतीत परीक्षा शुल्क भरल्याशिवाय अर्ज विचारात घेतला जाणार नाही. अर्ज भरण्याची व परीक्षाशुल्क भरण्याची अंतिम दिनांक / विहित वेळेपूर्वीच उमेदवारांनी संपूर्ण प्रक्रिया पूर्ण करणे बंधनकारक राहील.

३१.५ ज्या उमेदवारांनी यापूर्वी जरी त्यांचे नाव रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शक केंद्राकडे, सेवा योजन कार्यालय, समाजकल्याण, आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी तसेच जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी कार्यालयात नावे नोंदविली असली तरी अशा उमेदवारांना विहित मुदतीत स्वतंत्ररित्या ऑनलाईन अर्ज करणे व परिक्षा शुल्क भरणे आवश्यक राहील (माजी सैनिकांना परीक्षा शुल्क भरणे आवश्यक नाही) तसेच प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त, अंशकालीन, खेळाडू अशा इच्छुक व पात्र उमेदवारांनी देखील भरतीच्या अधिकृत संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करणे आवश्यक आहे. अशा उमेदवारांनी अन्य कोणत्याही मार्गाने सादर केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत व त्यांना याबाबत या कार्यालयामार्फत स्वतंत्रपणे कळविले जाणार नाही.

३१.६ अनुभवाच्या कालावधीची गणना जाहिरात प्रसिद्ध केलेल्या दिनांकापर्यंत पूर्ण केलेली असावी. शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही-२००४/प्र.क्र.१०/०४/१२, दिनांक ०३ जुलै, २००४ अन्वये, अनुभवाच्या कालावधीची गणना करताना अल्प कालावधीची किंवा तासिका तत्वावर, अतिरिक्त कार्यभार, प्रशिक्षण अभ्यागत किंवा अंशदानात्मक अशा स्वरुपाचे काम केलेल्या उमेदवारांना जर ते काम पूर्ण वेळ केलेले नसेल तर तो अनुभव नियुक्तीसाठी असल्याचे गृहित धरण्यात येणार नाही. त्यामुळे या प्रश्नाचा सर्वकष विचार करून आदेशानुसार सरळसेवेने नियुक्तीसाठी उमेदवाराच्या अनुभवाच्या कालावधीची गणना करतांना रोजंदारी, कार्यव्ययी, करारपध्दतीवर, मानधन इत्यादी स्वरुपात केवळ पूर्णवेळ काम केले असल्यासच असा कालावधी नियुक्तीसाठी विहित केलेल्या अनुभवासाठी ग्राहय धरण्यात येईल.

मात्र तासिका (on hour basis), नियतकालीक (periodical), अंशकालीन (part time), विद्यावेतन (on stipend), अभ्यागत (visiting), अंशदानात्मक (contributory), विनावेतन (without pay) तत्वावर केलेल्या अंशकालीन कालावधी, तसेच प्रभारी (Incharge) म्हणून नेमणूकीचा कालावधी, अतिरिक्त कार्यभाराचा (Addl. Charge) कालावधी अनुभवासाठी ग्राह्य धरण्यात येणार नाही. ज्या पदांसाठी खाजगी संस्थाचा अनुभव निश्चित केलेला आहे, अश्या खाजगी संस्था प्रचलित शासकीय धोरण / नियम यानुसार नोंदणीकृत असाव्यात.

Rojgar Marathi.com

३१.७ एस.एस.सी. अथवा तत्सम प्रमाणपत्रांवरील नावाप्रमाणे अर्ज भरावेत त्यानंतर नाव बदलले असल्यास अथवा प्रमाणपत्रावरील नावात कोणत्याही प्रकारचा बदल झाला असल्यास, त्यासंबंधीच्या बदला संदर्भातील विहित प्रमाणपत्रे / पडताळणीच्या वेळी सादर करावी.

३१.८ अराखीव (खुला) उमेदवारांकरीता विहित केलेल्या वयोमर्यादा तसेच इतर पात्रता विषयक निकषासंदर्भातील अटींची पूर्तता करणाऱ्या सर्व उमेदवारांचा (मागासवर्गीय उमेदवारांसह) अराखीव (खुला) सर्वसाधारण पदावरील शिफारशींकरिता विचार होत असल्याने, सर्व आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांनी त्यांच्या प्रवर्गातील पद आरक्षित / उपलब्ध नसले तरी, अर्जामध्ये त्यांच्या मूळ प्रवर्गासंदर्भातील माहिती अचूकपणे नमूद करणे बंधनकारक आहे.

३१.९ ऑनलाईन परीक्षा ही उमेदवारांच्या कोणत्याही कागदपत्रांची पूर्वतपासणी न करता घेतली जाणार असल्यामुळे यापरीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराची निवडीबाबतचे कोणतेही हक्क राहणार नाहीत. कागदपत्रांच्या पूर्ण छाननी नंतर उमेदवाराची गुणवत्तेच्या आधारे सामाजिक / समांतर आरक्षण निहाय अंतिम निवड केली जाईल. अर्जातील दाव्यानुसार मूळ कागदपत्रे संबंधित सक्षम प्राधिकाऱ्यांकडून पडताळणी / तपासणीच्या आधारे (आवश्यकतेनुसार) पात्र ठरलेल्या उमेदवारांना नियुक्ती देण्याची कार्यवाही करण्यात येईल. तसेच, उमेदवारांनी प्रमाणपत्र मिळण्याकरीता सादर केलेल्या पावत्या ग्राह्य धरल्या जाणार नाही. मूळ प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास, उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल. जात वैधता प्रमाणपत्र वगळून इतर सर्व आवश्यक ती प्रमाणपत्रे ही जाहिरात प्रसिद्ध केलेल्या दिनांकापर्यंत किंवा त्यापुर्वीच प्राप्त केलेली असणे आवश्यक आहे.

३१.१० शासकीय / निमशासकीय कर्मचाऱ्यांनी त्यांचे अर्ज त्यांच्या संबंधित नियुक्ती प्राधिकरणाच्या परवानगीने भरावयाचा आहे. अशी परवानगी प्राप्त केल्याची प्रत कागदपत्र पडताळणीच्या वेळी उमेदवाराकडे असणे आवश्यक आहे.

३१.११ ऑनलाईन अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे पात्रता परीक्षेस बसण्याचा / कागदपत्र पडताळणीस बोलविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार विहित अर्हता धारण करीत नसल्याचे आढळल्यास किंवा खोटी माहिती पुरविल्यास अथवा एखाद्या अर्जदाराने त्याच्या निवडीसाठी निवड समितीवर प्रत्यक्ष / अप्रत्यक्षरित्या दबाव आणला अथवा गैरप्रकाराचा अवलंब केल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल.

३१.१२ माजी सैनिकांसाठी असलेल्या पदांवर नियुक्तीसाठी पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्यांच्यासाठी आरक्षित असलेली पदे भरतीसंदर्भात शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश, परिपत्रक, शासन निर्णय यानुसार कार्यवाही करण्यात येईल.

३१.१३ खेळाडू / महिला / प्रकल्पग्रस्त / भूकंपग्रस्त / अंशकालीन उमेदवार या समांतर आरक्षणाचे प्रवर्गातून पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर पदांसाठी त्या त्या सामाजिक प्रवर्गातून सर्वसाधारण (समांतर आरक्षण विरहीत) पात्र उमेदवारांमधून गुणवत्तेनुसार विचार करणेत येईल.

३१.१४ जाहिराती मधील काही मुद्दे शासन निर्णयाच्या विसंगत असल्यास शासन निर्णय अंतिम राहील. जाहिरातीतील तांत्रिक / लेखानिकी चुकांचा फायदा उमेदवारांना घेता येणार नाही.

३१.१५ पदभरती पूर्ण होईपर्यंत वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या शासन निर्णय / शासन शुध्दीपत्रक / शासन अधिसूचना यानुसार सदर पदभरती नियम / निकषामध्ये बदल होऊ शकतो.

३१.१६ शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या अधिसूचना, शासन निर्णय, परिपत्रके, आदेश इत्यादी तसेच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे सेवाविनियम आणि महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश, परिपत्रके इत्यादी बंधनकारक असतील.

३१.१७ परीक्षा शुल्काचा भरणा यशस्वी न झाल्यास पुन्हा शुल्क भरण्याची कार्यवाही प्रस्तुत जाहिरातीच्या अनुषंगाने विहीत दिनांक / विहीत वेळेपूर्वीच करणे आवश्यक आहे. कोणत्याही कारणास्तव व्यवहार अयशस्वी ठरल्यास यासंदर्भातील तक्रारींची दखल घेतील जाणार नाही. विहीत मुदतीत परीक्षा शुल्काचा भरणा करू न शकलेल्या उमेदवारांचा संबंधित भरतीप्रक्रियेकरीता विचार केला जाणार नाही.

३१.१८ उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नमूद केलेली शैक्षणिक अर्हता, वय, अधिवास, जात, उन्नत प्रगत गटात मोडत नसणे, महिला आरक्षण, खेळातील प्राविण्य, प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त, माजी सैनिक, अनाथ, दिव्यांग व इतर बाबी सिध्द करणे ही सर्वस्वी जबाबदारी उमेदवाराची राहील. यापैकी संबंधित उमेदवारास लागू असलेली ऑनलाईन अर्जात नमूद केलेली कोणतीही बाब उमेदवार सिध्द करू न शकल्यास अशा उमेदवाराची निवड भरती प्रक्रियेच्या / शासकीय सेवेच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

३१.१९ उमेदवारांनी त्यांचे नावात बदल केला असल्यास त्या संदर्भातील आवश्यक कागदपत्रे / शासन अधिसूचना (गॅझेट) सादर करणे आवश्यक राहील.

३१.२० ज्या उमेदवारांचा समावेश समांतर आरक्षणातंर्गत निवड यादीत करण्यात येईल, अशा पात्रताधारक उमेदवारांची समांतर आरक्षणासंदर्भात कागदपत्रे संबंधित शासकीय विभागाच्या सक्षम प्राधिकाऱ्याकडून पडताळणी करुन घेण्यात येतील. सदर पडताळणीमध्ये पात्र ठरलेल्या उमेदवारांचाच निवडीबाबत अंतिम निर्णय घेण्यात येईल.

३१.२१ कागदपत्रे पडताळणीसाठी शाळा सोडल्याचा दाखला, जन्म दाखला, विहित शैक्षणिक अर्हताबाबतची गुणपत्रके व प्रमाणपत्रे, संगणक प्रमाणपत्र, अनुभव प्रमाणपत्रे, मागासवर्गीय उमेदवारांनी सक्षम अधिकाऱ्याने दिलेले जात प्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्र, वयाबाबतचा पुरावा, अधिवास प्रमाणपत्र आणि अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्ग वगळता अन्य सर्व मागास प्रवर्गातील उमेदवारांनी ते उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे नवीनतम प्रमाणपत्र इत्यादी बाबतची सर्व मूळ कागदपत्रे व त्याच्या प्रत्येकी दोन स्वसाक्षांकीत प्रतीसह उमेदवाराने उपस्थित राहणे आवश्यक आहे.

३१.२२ कागदपत्रे तपासणीचे वेळी उमेदवार शैक्षणिक व इतर अर्हता धारण करीत नसल्याचे आढळून आल्यास किंवा तपासणीकरीता अपूर्ण कागदपत्रे सादर केल्यास त्यास निवडीसाठी अपात्र करण्यात येईल व त्याबाबत उमेदवाराची कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही. तसेच स्वत:च्या ओळखीच्या पुराव्यासाठी अर्जासोबत जोडलेला ओळखीचा पुरावा व स्वत:चे आधार कार्ड व त्याची स्वसाक्षांकित (Self Attested) छायांकित प्रत सोबत आणणे अनिवार्य आहे.

३१.२३ भरती प्रक्रियेस विलंब होणे, परीक्षा पूर्णपणे रद्द होणे अथवा निवड प्रक्रिया पूर्ण करण्यात अडचणी निर्माण होणे याबाबतची शक्यता नाकारता येत नाही. अशा परिस्थितीत परीक्षा वेळेत पार पाडण्याचे / परीक्षा पुन्हा सुरू करण्याचे / निवड प्रक्रिया पुन्हा राबविण्याबाबतचे / भरतीमध्ये अंशत: / पूर्ण बदल करण्याचे सर्व अधिकार प्राधिकरणाने राखुन ठेवले आहेत.

३१.२४ पात्र ठरलेल्या प्रत्येक उमेदवाराला त्याने रजिस्टर्ड केलेल्या ई-मेल द्वारे निवडसूची / प्रतिक्षा यादी व नियुक्तीबाबत कळविण्यात येईल. तसेच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर निवडसूची / प्रतिक्षा यादी / नियुक्तीची यादी प्रसिध्द करण्यात येईल.

३१.२५ सदर भरती प्रक्रियेसाठी अपात्र ठरलेल्या उमेदवारांना स्वतंत्ररित्या कळविण्यात येणार नाही.

३१.२६ उपरोक्त भरती प्रक्रिया / परीक्षा स्थगित करणे किंवा रद्द करणे, त्यामध्ये अंशत: बदल करणे, पदांच्या एकूण संवर्गनिहाय संख्येमध्ये वाढ किंवा घट करण्याचे, सामाजिक, समांतर, दिव्यांग व इतर आरक्षणामध्ये संवर्गनिहाय / पदनिहाय बदल करण्याचे, सरळसेवा भरती प्रक्रियेच्या जाहिरातीमधील अटी व शर्तीमध्ये बदल करण्याचे / नव्याने अटी व शर्ती समाविष्ट करण्याचे / अटी व शर्ती रद्द करण्याचे सर्व अधिकार महानगर आयुक्त, मुं.म.प्र.वि.प्राधिकरण राखून ठेवत असून, त्यांचा निर्णय अंतिम राहील. तसेच भरती प्रक्रिये संदर्भात वाद, तक्रारीबाबत अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार महानगर आयुक्त, मुं.म.प्र.वि.प्राधिकरण यांना राहतील. याबाबत उमेदवारांना कोणताही हक्क / दावा सांगता येणार नाही. सदर भरती प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर पूर्णत: वा अंशत: रद्द करण्याचे अथवा त्यात बदल करण्याचे अधिकार महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण हे राखून ठेवत आहे.

सही /-
महानगर आयुक्त
मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

स्थळ :- मुंबई

दिनांक :- १८ फेब्रुवारी, २०२६

Rojgar Marathi.com